# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, सोमवार, दिनांक ५ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३१३ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- +वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

### जीवघेणा नायलॉन मांजा

मकरसंक्रातीचे दिवस येताच पंतगबाजीला ऊत आला आहे. आपली पतंग कटू नये यासाठी अनेकजण नवनवीन उपाय शोधत आहेत. पूर्वी रिल हा प्रकार होता किंवा तयार मांजा मिळत होता. परंतु, तयार मांजा फारसा प्रभावशाली नसल्याने अनेक शौकीन पतंगबाज हाताने घोटलेला मांजा तयार करत असत. मात्र, मागील काही वर्षापासून हाताने घोटणाऱ्या मांजाची जागा नायलॉन मांजाने घेतली आहे. या मांजाने आतापर्यंत अनेकांचे बळी घेतले आहेत, तर बरेचसे जखमी झाले आहेत. रस्त्याने जाणाऱ्या वाहनचालकांच्या गळ्याला हा राक्षसरूपी मांजा कधी अडकणार याचा नेम नाही. त्यामुळे शासनाने या मांजावर प्रतिबंध आणला आहे. तरीही चोरून लपून नायलॉन मांजा शहरात येत आहे. दरदिवशी पोलिस या ना त्या ठिकाणी कारवाई करीत नायलॉन मांजा विकणाऱ्यांची धरपकड करीत आहेत. तरीही नायलॉन मांजा विकणाऱ्यांना काहीच फरक पडत नाही. हा प्रकार न्यायालयाच्या लक्षात येताच न्यायालयाने हस्तक्षेप करीत मांजा वापरणारा आणि विकणाऱ्यांवर जबर दंड आकारला आहे. नायलॉन मांजाने पतंग उडविणाऱ्यास लगेच ५० हजाराचा दंड भरावा लागणार आहे. अल्पवयीन मुलगा नायलॉन मांजाने पतंग उडविताना दिसल्यास त्याच्या पालकाला दंड भरावा लागेल. त्याचप्रमाणे नायलॉन मांजा विक्रेत्यांकडून लाखोचा दंड वसूल करण्याचे आदेश दिले. यालाच म्हणतात खाया पिया कुछ नही, ग्लास फुटा आठानेका. न्यायालयाने ठरविलेला दंड पाहून निदान शौकीन पतंगबाज आणि विक्रेते यातून धडा घेतील अशी आशा बाळगायला काही हरकत नाही.

## शिवसेना-मनसे-राष्ट्रवादीचा वचननामा

### ■ नार्वेकरांनी स्वत:ला 'नायक' समजू नये -उद्धव ठाकरे
### ■ ते महाराष्ट्राला यूपी आणि बिहार बनवत आहेत -राज ठाकरे

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना (यूबीटी) प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यांचा युतीचा जाहीरनामा जाहीर केला. उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी संयुक्तपणे पत्रकार परिषद घेतली. देशातील वातावरण असे आहे की, जणू लोकशाही जमावाने ताब्यात घेतली आहे, असा दावा उद्धव ठाकरे यांनी केला आहे. मतांची चोरी केल्यानंतर, ते आता उमेदवारांची चोरी करतात, असा आरोप उद्धव यांनी महापालिका निवडणुकीसाठी सत्ताधारी आघाडीच्या उमेदवारांच्या बिनविरोध विजयावर केला.

उमेदवारांना बिनविरोध निवडून देऊन तुम्ही मतदारांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला आहे. या ठिकाणी पोटनिवडणुका झाल्या पाहिजेत...

' ज्या वॉर्डांमध्ये उमेदवार बिनविरोध निवडले गेले आहेत त्या निवडणुका रद्द करा, त्या वॉर्डांमध्ये पुन्हा मतदान प्रक्रिया सुरू करा:, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी राज्य निवडणूक आयोगाला केली आहे.

'...ही आता लोकशाही नाही तर झुंडशाही आहे, जरी आपण त्यांना मतदान चोरी करताना रंगेहाथ पकडले तरी आता त्यांनी उमेदवारांची चोरी करायला सुरुवात केली आहे...' आम्ही निवडणूक आयोगाला आव्हान देतो की, त्यांनी निवडणूक अधिकाऱ्यांचे सर्व कॉल रेकॉर्ड दाखवावेत, आम्हाला ते पहायचे आहे...'असंही उद्धव ठाकरे म्हणाले.



पत्रपरिषदेला संबोधित करताना उद्धव आणि राज ठाकरे शेजारी खा. संजय राऊत

### वचननाम्यातील मुद्दे

शिवसेना आणि मनसे यांनी जाहीर केलेल्या वचननाम्यात महापालिकेची जागा खासगी बिल्डरला देणार नाही, मुंबईची सेवा करणारे महापालिका, बेस्ट, पोलिस, मिल कामगार यांना हक्काचे घर, पाच नवीन मेडिकल कॉलेज, महापालिका दवाखान्यात जेनेरिक औषधी, नोंदणीकृत घरकामगार महिलांना दीड हजार स्वाभिमान निधी, महिला मच्छीमार विक्रेत्यांना आर्थिक मदत, मासाहेब किचनतर्फे दहा रुपयात दुपारचा नास्ता, जेवण, प्रत्येक दोन किमीवर महिलांसाठी शौचालय, घर टॅक्स माफ आदींचा वचननाम्यात समावेश आहे.

## मुंबई कुणाच्या बापाची नाही -देवेंद्र फडणवीस



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ :** मुंबई कुणाच्या बापाची मालमत्ता नाही आणि मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याची हिंमत कुणाच्या बापाच्या बापाच्या बापातही नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्यावर नाव न घेता टीका केली. वरळीत शनिवारी महायुतीच्या प्रचाराचा शंखनाद झाला. या वेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले उपस्थित होते. शिवसेनेतील फुटीवर भाष्य करताना फडणवीस म्हणाले, जन्माने रक्ताचा वारसा मिळू शकतो, पण विचारांचा वारसा कर्माने मिळतो. तो वारसा आज एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे.' फडणवीसांनी मनपातील ७० हजार कोटींच्या मुदत ठेवींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या रसिदी काय आम्ही चाटायच्या? गिरणी कामगार देशोधडीला लागला तेव्हा हे पैसे का वापरले नाहीत? आम्ही बिल्डरांच्या घशात जमीन न देता म्हाडाच्या माध्यमातून बीडीडी चाळीतील ८० हजार मराठी माणसांना ५०० फुटांची घरे मोफत दिली,' असे त्यांनी सांगितले. संविधान बदलण्याची भीती घालणाऱ्या काँग्रेसलाच आता जनता सत्तेतून बदलल्याशिवाय राहणार नाही,' अशा शब्दांत केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी विरोधकांचा समाचार घेतला.

**श्रेय चोरणारी टोळी सक्रिय**

मुंबईतील विकासकामांवरून त्यांनी विरोधकांना लक्ष्य केले. मुंबईत सध्या श्रेय चोरणारी एक टोळी सक्रिय झाली आहे.

## बांगलादेशचा टी२० वर्ल्ड कपसाठी भारत दौऱ्यावर बहिष्कार

**वृत्तसंस्था**
**ढाका, दि. ४:** भारत आणि बांगलादेश यांच्यातील क्रिकेट संबंधांमध्ये मोठी दरी निर्माण झाली असून, याचे रूपांतर आता कूटनैतिक संघर्षात झाले आहे.

बांगलादेशच्या अंतरिम सरकारने अधिकृतपणे मागणी केली आहे की, पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० वर्ल्ड कपमधील बांगलादेशचे सर्व साखळी सामने भारताऐवजी श्रीलंकेत आयोजित करावेत. बांगलादेशचा खेळाडू मुस्तफिजुर रहमानची आयपीएलमधून हकालपट्टी केल्याने बांगलादेशने ही आक्रमक भूमिका घेतली आहे.

बांगलादेश सरकारचे युवा आणि क्रीडा सल्लागार आसिफ नजरूल यांनी या मुद्द्यावर अत्यंत कठोर भूमिका मांडली आहे.

## उद्धव ठाकरेंनी ३ लाख कोटींचा भ्रष्टाचार केला -अमित साटम

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४**

अमित साटम यांनी पत्रकार परिषद घेऊन उद्धव ठाकरेंवर पलटवार केला आहे. सोबतच उद्धव ठाकरे यांनी तब्बल ३ लाख कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप साटम यांनी केला आहे.



अमित साटम यांनी पत्रकार परिषद घेऊन उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले. ठाकरेंनी साटम यांचा उल्लेख चाटम असा केला होता. यावर बोलताना उद्धव ठाकरेंनी मला शिवी नाही दिली. त्यांनी प्रत्येक मराठी माणसाला शिवी दिली आहे. त्यांनी मराठी माणसाचा अपमान केला आहे. मी सामान्य कुटूंबातून आलेलो आहे. कोणाच्या आशीर्वादाने आलो नाही, असा टोला साटम यांनी लगावला. तसेच पुढे बोलताना ठाकरेंनी कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केला आहे, असा आरोप साटम यांनी केला. मुंबई शहरात रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता अशी स्थिती आहे. गेल्या १० वर्षांमध्ये २१ हजार कोटी रुपये खर्च करून रस्त्याची अवस्था बिकट आहे. हे उद्धव ठाकरे यांच्यामुळेच झाले आहे.

कोरोना काळात महालक्ष्मी येथील कोव्हिड सेंटर हे बिल्डरच्या भल्यासाठीच उभारण्यात आले होते. बॉडी बॅग, पीपीई कीट असे काहीही त्यांनी सोडले नाही, असा आरोप साटम यांनी केला. तसेच मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांनी १७०० बार रेस्टॉरंटकडून वसुली केली. ते कोस्टल रोड आम्ही केला, असे म्हणत आहेत. परंतु त्यांच्या काळात हा रोड तयार करण्यासाठी तारखा ठरत नव्हत्या. कोस्टल रोडचं सगळं श्रेय हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आहे, असा दावा करत साटम यांनी उद्धव ठाकरे यांनी ३ लाख कोटी रुपयांचा घोटाळा असा गंभीर आरोप केला.

## काल बालकांचे वर्कशॉप आज पालकांचे : शेवाळे

**मुंबई, दि. ४**

शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि माजी खासदार राहुल शेवाळे यांनी ठाकरेंच्या वचननाम्यावर टीका केली आहे. शिवसेनेला वेदना देईल असा वचननामा आहे. त्यांनी हिंदू, मराठी हे शब्द वगळले आहेत. त्यांचा मागचा वचननामा पहिला तर त्यात सगळे शब्द आहेत. यांचा शब्द भ्रष्टाचार मतलब आणि तिजोरी लुटण्याचा आहे. वंदनीय हिंदूहृदय सम्राट हे शब्द वापरले नाहीत. त्यांनी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे असा उल्लेख केला आहे. जन्मशताब्दी वर्षीच यांनी बाळासाहेब ठाकरे यांचा अपमान केल्याची टीका शेवाळे यांनी केली. काल बालकांनी वर्कशॉप केले आणि आज पालकांनी केल्याचा टोला देखील शेवळेंनी लगावला.







## माध्यमांनी निवडक वर्गाला प्रतिनिधित्व दिले : गिरीश कुबेर

**अजित जगताप**
**सातारा, दि. ४**

मराठी साहित्यामध्ये प्रस्थापितांना वाचकांनी पुरते ओळखले आहे . त्यामुळे दलित वांग्मय उदयाला आले. ज्ञानपीठ पुरस्कार मोठा आहे. परंतु , तीन भाषेमध्ये ज्यांचे ग्रंथ झाले ते सरस्वती पुरस्कार प्राप्त साहित्यिक डॉ. शरण कुमार लिंबाळे यांची लहान बातमी लागते. कारण माध्यमानी निवडक वर्गाला प्रतिनिधित्व दिले. अशा शब्दात पुरोगामी विचाराचे प्रवर्तक आणि पत्रकार संपादक गिरीश कुबेर यांनी निर्भीडपणाने आपले मत मांडले. यावेळी जमलेल्या प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. अध्यक्षीय भाषणाच्या गुळमळीतपणामुळे पेंगलेल्या साहित्य संमेलनाला यामुळे चांगलीच जाग आली. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या शेवटच्या दिवशी ख्यातनाम लेखक, संपादक गिरीश कुबेर यांची ज्येष्ठ पत्रकार प्रसन्न जोशी आणि किशोर बेडकीहाळ यांनी मुलाखत घेतली. मुलाखतीमध्ये सडेतोडपणाने मांडणी करून खऱ्या अर्थाने 'नाही रे' वर्गाचेच दुःख विचारपीठावर मांडल्यामुळे अनेकांनी पत्रकार कुबेर यांचे कौतुक केले. या देशाला मध्यम मार्गाने पुढे जाता येते. आज पुरस्कार धार्जिण्या लोकांचेच कौतुक होत आहे. तर दुसरा वर्ग लिहिता असला तरी त्याच्याकडे लक्ष दिले जात नाही. पत्रकारितेमध्ये सुद्धा एक व्यवसायाची नशा असणे आणि प्रस्थापितांना प्रश्न विचारण्याचा आनंद घेणे. हे व्यावसायिक यश आहे. पॅशन आहे. पण अलीकडच्या काळामध्ये कोणाला तरी वाईट वाटेल म्हणून तलवारी म्यान केल्या जातात. याचा दाखला देताना त्यांनी सांगितले कि, भाजप नेते लालकृष्ण अडवाणी एकदा म्हणाले होते की ,पत्रकारांना वाकायला सांगितले ते रांगायला लागले. आता पत्रकारितेमध्ये उत्तरदायित्व राहिलेले नाही. ज्येष्ठ पत्रकार गोविंद तळवलकर हे आदर्श व्यक्तिमत्व आहे. त्यांनी लोकप्रिय होण्याचा मार्ग स्वीकारला नाही. तडजोडी केल्या नाहीत.



युवाराष्ट्र दर्शन

# चंद्रपूर जिल्हा

सोमवार दि.५ जानेवारी २०२६



## ऑलम्पिकवीर खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा होणार

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.४ :** राज्य शासनाच्या निर्देशान्वये १५ जानेवारी हा दिवस ऑलम्पिकवीर दिवगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. स्वतंत्र भारताचे पहिले ऑलम्पिक पदक विजेते महाराष्ट्राचे सुपुत्र दिवंगत खाशाबा जाधव यांचा जीवनातून नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे, यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व शासनमान्य खाजगी शाळा, महाविद्यालय, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय, क्रीडा संघटना/असोशिएसन, क्रीडा मंडळे, क्रीडा अकादमी, शासनाच्या क्रीडा योजनांचा लाभ/अनुदान मिळालेल्या सर्व संस्था, अन्य संस्था व मंडळे यांनी राज्य क्रीडा दिनाचे आयोजन करावे, असे निर्देश प्राप्त झाले आहेत.याअंतर्गत खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व त्यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान या विषयावरील व्याख्यानांचे आयोजन करावे. प्रा.संजय दुधाने लिखित 'ऑलम्पिकवीर खाशाबा जाधव' हे पुस्तक प्रत्येक शाळा महाविद्यालयांच्या ग्रंथालयात खेळाडूंना वाचनासाठी उपलब्ध असावेत. क्रीडा संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी रॅलीचे / मॅरेथान स्पर्धांचे आयोजन करावे. शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध खेळासंदर्भातील नियमावली, आलिंपिक स्पर्धासोबतच अन्य महत्वाच्या स्पर्धा, त्यामधील यशस्वी खेळाडू व अन्य बाबी यांची प्राथमिक माहिती देण्यासाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन तसेच ऑनलाईन संपर्क माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांचा नामवंत खेळाडूंसोबत संवाद साधावा.

# आ.मुनगंटीवार व आ.जोरगेवार यांच्यात कुठेही वाद नसून सर्व एकत्र आहोत : मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.४ :** आ.सुधीरभाऊ मुनगंटीवार व आ.किशोर जोरगेवार यांच्यात कुठेही वाद नाही.एखाद्या गोष्टीवर मतभेद होवू शकतात.मात्र मनभेद नाही.सर्व लोक एकत्र आहोत.असे राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी बोलतांना सांगितले.चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ चंद्रपूरात आयोजित रोड शो दरम्यान ते बोलत होते.

राज्यातीत महानगरपालिकेच्या निवडणुकीचा बिगुल वाजताच आ.मुनगंटीवार व आ.जोरगेवार यांच्यातील वाद चव्हाट्यावर आला.आ.किशोर जोरगेवार यांनी भाजपात प्रवेश केल्यापासून पक्ष संघटनेमध्ये मोठी अस्वस्थता कार्यकर्त्यामध्ये आली.यामूळे भाजपात दोन गट तयार झाले.आ.मुनगंटीवार यांच्या विकासाचा झंझावात सुरु असतांना आ.किशोर जोरगेवार यांच्यामधील वर्चस्वासाठीची लढाई सर्वासमोर दिसून आली.भाजपामध्ये बिथरलेल्या कार्यकर्ते संभ्रमात आले. आ.मुनगंटीवार व आ.जोरगेवार यांच्या कार्यकर्त्यामध्ये दोन गट पडली.चंद्रपुरात रा.स्वं.संघाचे सरसंघचालक यांच्या हस्ते होणाऱ्या कॅन्सर हॉस्पीटलचा उद्घाटन कार्यक्रम रद्द करण्याची मागणी आ.जोरगेवारांनी केली होती.येथूनच आ.मुनगंटीवार व आ.जोरगेवार यांच्यामधील वाद सर्वांसमोर आला.भाजप पक्षश्रेष्ठीने चंद्रपूर मनपा निवडणूक आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या मागदर्शनात होणार असल्याचे सांगून निवडणूक निरीक्षक म्हणून संचेती, प्रभारी अशोक नेते, व निवडणूक प्रमुख म्हणून आ.किशोर जोरगेवार यांची नियुक्ती केली.त्यानूसार भाजपा उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या.भाजपाच्या दोन गटातील कार्यकर्त्यांना समान जागा वाटपासाठी एकमत झाले नाही.शेवटी उमेदवारांच्या निवडीसाठी नागपुरात आ.मुनगंटीवार, आ.जोरगेवार, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत बैठक झाली.सदर बैठकीतही दोन्ही आमदारामंध्ये शाब्दीक चकमक उडाली होती.शेवटी तडजोडीतून सहमती होवून उमेदवार ठरविण्यात आले.व भाजप प्रदेशाध्यक्ष यांचेकडून उमेदवारांची अंतिम यादी पाठविण्यात आली.मात्र प्रदेशाध्यक्षांच्या अंतिम यादीत बदल करुन मर्जीतील १७ नावे टाकून त्यांना उमेदवारी देण्यात आली.नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी प्रदेशाध्यक्षांची अंतिम यादी उघड होताच.निष्ठावंतांचा संयम सुटला.व तिकीट वाटपावरुन गोंधळ उडाला.पक्षश्रेष्ठींने गांभीर्याने घेत तडकाफडकी महानगर अध्यक्षाला पदमुक्त केले.पक्षविरोधी केलेल्या कार्यवाहीमूळे पक्षश्रेष्ठीने शिस्तभंगाची कारवाई केली.भाजपाची यादीमधील उमेदवार बदलविल्याप्रकरणामूळे भाजपातील गटबाजी कायम असल्याचे पूढे आले.सदर गटबाजीचे प्रदर्शन निवडणुकीच्या काळात होत असल्याने, याला शमवीण्यासाठी मुख्यंमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी सर्व आमदारांना रोड शो दरम्यान एकत्र आणले.रविवार ४ जानेवारी रोजी रोड शो दरम्याना मुख्यमंत्री देवेन्द्र फडणीस म्हणाले की, सद्या चंद्रपूरचा जो विकास सर्व बघत आहेत.या विकासामध्ये आ.सुधीरभाऊ मुनगंटीवार, आ.किशोर जोरगेवार तसचे माजी खासदार हंसराज अहीर यांचे योगदान आहे.चंद्रपूरमध्ये भाजपाशिवाय कोणी विकास केला हे कोणी दाखवूच शकत नसल्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणविस यांनी बोलतांना सांगितले.जिल्ह्यातील सर्व नेते एकत्रित असल्याचे त्यांनी सांगितले.प्रचारासाठी कमी वेळे आहे.सर्व ठिकाणी पोहचायचे आहे.यामूळे वेगळ्या पध्दतीने ३६.० डिग्री प्रचार करावयाचा असल्याचे त्यांनी सांगितले.युतीच्या राजकारणात २० मंत्रिपदे बाहेर द्यावी लागली.त्यामूळे भाजपाच्या अनेक कार्यकर्त्यावर अन्याय करावा लागला.जेव्हा युतीचे राजकारण करतो.तेव्हा कोणाला तरी त्याग करावा लागतो.त्यामूळे चंद्रपूर जिल्ह्याला मंत्रीपद मिळाले नसल्याचे कारण मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी बोलतांना स्पष्ट केले.

## सर्व एकत्र असल्याचा संदेश, मात्र उमेदवार यादी बदलण्यावर मुख्यमंत्र्यांचे मौन

चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत चर्चांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व नेते एकत्र आहेत असा ठाम संदेश दिला. मात्र, भाजपच्या उमेदवार यादीत करण्यात आलेल्या बदलांबाबत त्यांनी मौन बाळगल्याने राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे.गेल्या काही दिवसांपासून उमेदवार यादी बदल, शेवटच्या क्षणी करण्यात आलेले फेरबदल आणि त्यावरून स्थानिक पातळीवर असंतोष असल्याच्या चर्चा सुरू होत्या. या रोड शो दरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी पक्षातील एकजुटीवर भर दिला. आमदार सुधीर मुनगंटीवार व आमदार किशोर जोरगेवार यांच्यात कोणताही वाद नाही. भाजपमध्ये गटबाजी नाही, सर्वजण एकत्र आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.मात्र, उमेदवार यादीत नेमके का बदल करण्यात आले, कोणत्या निकषांवर हे निर्णय घेण्यात आले आणि स्थानिक पातळीवरील नाराजीबाबत काय भूमिका आहे, या मुद्द्यांवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी थेट भाष्य टाळले. त्यांच्या या मौनामुळे पक्षांतर्गत निर्णय प्रक्रियेबाबत अनेक प्रश्न अनुत्तरितच राहिले आहेत.सद्या, एकजुटीचा संदेश देणे हे सध्याच्या घडीला भाजपसाठी महत्त्वाचे असले, तरी उमेदवार यादीतील बदलांमुळे निर्माण झालेला असंतोष कसा हाताळला जाणार, यावरच पुढील राजकारण अवलंबून असेल. काही कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असल्याचे उघडपणे दिसत असून, त्याचा परिणाम प्रचारावर होणार की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, भाजपकडून अधिकृतपणे यादी बदलांबाबत स्पष्टीकरण येणे बाकी आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेला सर्व एकत्र असल्याचा संदेश कार्यकर्त्यांना कितपत बळ देतो आणि उमेदवार यादीवरील मौनामुळे निर्माण झालेली संभ्रमाची स्थिती कधी दूर होते, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

# वाहतुकीचे नियम पाळले तर अपघात कमी होण्यास मदत



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.४ :** रस्ते अपघातात होणारे मृत्यु हे मानवनिर्मित आहे. अपघातांची संख्या आणि त्यात होणारे मृत्यु आपण नक्कीच कमी करू शकतो. मात्र त्यासाठी सर्वांनी वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती, समाज, शासन आणि प्रशासन मिळून जिल्ह्यात अपघातांची संख्या कमी करू या, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, वाहतूक नियंत्रण शाखा आणि जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या वतीने जनता महाविद्यालय येथे रस्ता सुरक्षा अभियान - २०२६ चा शुभारंभ करतांना ते बोलत होते. यावेळी मंचावर मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, महानगरपालिका आयुक्त अकुनुरी नरेश, अतिरिक्त पोलिस अधिक्षक ईश्वर कातकाडे, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, एस.टी. महामंडळाच्या विभागीय नियंत्रक स्मिता सुतवणे, महाविद्यायाचे प्राचार्य डॉ. आशिष महातळे आदी उपस्थित होते.

रस्ता सुरक्षा अभियानाचे महत्व वाढले आहे, असे सांगून जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, आज रस्त्यांची लांबी आणि रुंदी वाढली असून त्यावर वाहनांची संख्यासुध्दा मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे अपघातही वाढले. यात कुणी जखमी होतात तर कुणाला जीव गमवावा लागतो. भारतात दरवर्षी रस्ते अपघातात मृत्यु पडणा-यांची संख्या दीड लाखांच्यावर आहे. हे मृत्यु आपण नक्कीच रोखू शकतो. वाहतुकीचे नियम पाळले नाही तर अपघातांची संख्या वाढते, त्यामुळे सर्वांनी नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. रस्त्यावर अतिजलद जाणे टाळावे. आपले जीवन अमुल्य असून १ - २ मिनिटांमध्येसुध्दा आपला जीव जाऊ शकतो. त्यामुळे कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आपले मित्र, परिवारातील सदस्य व इतरांना वाहतुकीच्या नियमांबाबत जनजागृती करावी, जेणेकरून आपला जीव सुरक्षित राहू शकेल, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले.

## जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.४ :** क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे खेळाडू व क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचा गौरव व्हावा व त्यांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने दरवर्षी महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणेच्या वतीने जिल्ह्यातील तीन सर्वोत्कृष्ट गुणंवत खेळाडू (महिला, पुरुष व दिव्यांग) व एक गुणंवत क्रीडा मार्गदर्शकाला पुरस्कार दिले जातात.

त्या अनुषंगाने सन २०२४-२५ करिता चंद्रपूर जिल्ह्यातील खेळाडू, व क्रीडा मार्गदर्शक यांच्याकडून जिल्हा क्रीडा पुरस्काराकरिता अर्ज मागविण्यात येत आहे. सदर अर्ज १२ जानेवारी २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे क्रीडा अधिकारी मोरेश्वर गायकवाड यांच्याकडे उपलब्ध आहे. तसेच हे अर्ज १२ जानेवारी २०२६ रोजी पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावे. उशीरा येणारे अर्ज स्वीकारले जाणार नाही.अर्ज सादर करताना अर्जदाराचे महाराष्ट्रात सलग १५ वर्ष वास्तव्य असणे आवश्यक आहे. तसेच क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत १० वर्ष महाराष्ट्रात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केले असले पाहिजे व त्यांनी वयाची ३५ वर्ष पुर्ण केलेली असणे आवश्यक आहे. खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपूर्व ५ वर्षापैकी २ वर्ष त्या जिल्ह्याच्या मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत खेळामध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे. तसेच अर्ज करीत असतांना शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासननिर्णय दि. १४ डिसेंबर २०२२ च्या जिल्हा क्रीडा पुरस्कार नियमातील अटी व शर्तीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

## सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी दि.४ :** ब्रम्हपुरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तुलान माळ येथे आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिवस म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.सावित्रीबाईच्या फोटोला हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून तुला न मेंढा ग्राम-पंचायत सरपंच राजकुमार कुतरमारे, अतिथी विजय कुंभारे,जगदीश मेहेर,चंद्र शेखर चौधरी, नीलिमा यावलकर उपस्थित होत्या.मान्यवरांनी सावित्रीबाई जीवनकार्यावर भाषणातून प्रकाश टाकला.यावेळी शाळेतील मुलींनी सावित्रीबाई ची वेशभूषा केली होती.संचालन टीका राम बोकडे यांनी केले.कार्यक्रमाला शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

## एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल देवाडा करिता प्रवेश अर्ज सुरू

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.४ :** राष्ट्रीय आदिवासी छात्र शिक्षा समितीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्रातील एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत येत्या १ मार्च २०२६ रोजी प्रवेश पूर्व परिक्षा एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल, देवाडा, ता.राजुरा, येथे घेण्यात येणार आहे. या परीक्षाद्वारे इयत्ता ६ वी करिता २२२० नविन विद्यार्थ्यांची प्रवेश भर्ती तसेच इयत्ता ७ वी ते ९ करिता रिक्त असलेल्या जागांचा अनुशेष भरण्यात येणार आहे.

एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल, देवाडा मध्ये इयता ६ वी करिता ३० मुले व ३० मुली अशी ६० प्रवेश क्षमता राहणार आहे व इयत्ता ६ वी ते ९ वी ची भरती ही पुर्व परिक्षाद्वारे भरण्यात येणार आहे.

# गोवरी सेंट्रल परियोजनेसाठी कलम ९ ची अधिसुचना जारी

## हंसराज अहीर यांच्या प्रयत्नाने ७ गावातील शेतकऱ्यांना दिलासा



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.४ :** पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या विशेष पुढाकाराने अखेर वेकोलि बल्लारपूर क्षेत्रातील गोयेगाव, गोवरी, मुठरा, खामोना, खैरगांव, अंतरगांव, आर्वी या गावातील अधिग्रहीत शेतजमिनीला गोवरी सेंट्रल परियोजनाकरीता सीबी ॲक्ट सेक्शन ९ ची अधिसुचना दि. ०२ जानेवारी २०२६ रोजी कोल मंत्रालयाने जारी केली.

सदर प्रलंबित परियोजनेस पी.आर. मंजुरीपासून तर कॉस्ट प्लस खरेदीदार करारनाम्यापर्यंत आणि सेक्शन ४, सेक्शन ७, सेक्शन ९ करीता प्रस्तावित करण्यापासून तर अधिसुचना जाहीर होईपर्यंत प्रकल्पग्रस्तांनी भाजपा किसान आघाडीचे पूर्व जिल्हाध्यक्ष राजू घरोटे यांच्या नेतृत्वात संबंधित प्रकल्पग्रस्तांनी पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांची प्रत्यक्ष भेट घेवून गोवरी सेंट्रल परियोजनेच्या कार्यान्वयनातील अडसर दूर करण्याची मागणी केली होती.या मागणीची गांभीर्याने दखल घेत प्रकल्पग्रस्त बहुसंख्य ओबीसी शेतकरी व इतरांना न्याय मिळण्याकरीता अहीर यांनी सातत्याने नोव्हेंबर-डिसेंबर २०२५ मध्ये केंद्रीय कोळसा मंत्री यांच्या भेटी दरम्यान आग्रहपूर्वक विषय उपस्थित केला होता तसेच कोल इंडिया चेअरमन, चंद्रपूर जिल्हाधिकारी, वेकोलि सीएमडी, तसेच बल्लारपूर क्षेत्राचे क्षेत्रीय महाप्रबंधक यांच्या संयुक्त बैठक घेवून गोवरी सेंट्रल परियोजनेच्या कार्यान्वयनातील अडसर दुर करण्याचे तसेच रवीभवन, नागपूर येथे व जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर येथे सुध्दा मार्च २०२४ रोजी घेतलेल्या राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या सुनावणीत या प्रकरणी तातडीने कार्यवाहीचे निर्देश जारी केले होते. राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या निर्देशानुसार वेकोलि नागपूर मुख्यालयाने कोल इंडियाद्वारे या परियोजने संदर्भातील प्रकल्प अहवाल, मंजूर करवून घेत कोळसा खरेदीकरीता दि. ०६ जून २०२४ रोजी एनटीपीसी व वेकोलि दरम्यान कॉस्ट प्लस व खरेदीदार करारनाम्यावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. या करारामुळे आता गोवरी सेंट्रल परियोजनेच्या कार्यान्वयनास मार्ग मोकळा झाला आहे.

## शाळा व महाविद्यालयांत मतदान जनजागृती अभियान

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.४ :** चंद्रपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण करणे, मतदानाचे महत्त्व पटवून देणे तसेच मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या उद्देशाने चंद्रपूर शहर महनगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये (SVEEP) मतदान जनजागृती अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांनी दिली.

बुधवार ३१ डिसेंबर रोजी मनपा राणी हिराई सभागृहात विविध शाळांच्या मुख्याध्यापकांची बैठक बोलविण्यात आली होती. सदर बैठकीस उपायुक्त संदीप चिद्रावार, उपशिक्षणाधिकारी माध्यमिक विशाल देशमुख,उपशिक्षणाधिकारी प्राथमिक गणेश येरमे,मनपा प्रशासन अधिकारी सुनील आत्राम, नागेश नित तसेच ७३ शाळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनानुसार सदर अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

अभियानाच्या पहिल्या दिवशी दि. ५ जानेवारी २०२६ रोजी सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये 'चंद्रपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक व माझे कर्तव्य' या विषयावर निबंध स्पर्धा, ६ जानेवारी २०२६ रोजी 'मनपा चंद्रपूर सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६' या विषयावर चित्रकला स्पर्धा, तर दि. ७ जानेवारी २०२६ रोजी शाळा व महाविद्यालयांमध्ये चर्चासत्र, पोस्टर स्पर्धा व रांगोळी स्पर्धा शाळास्तरावर आयोजित करण्यात येणार आहेत.८ जानेवारी २०२६ रोजी सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, दि. ९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता गांधी चौक, चंद्रपूर येथे मनपा स्तरावरील चित्रकला स्पर्धा होणार आहे. शाळा स्तरावरील चित्रकला स्पर्धेतील तीन विजयी स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.दि. १० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८.०० ते ९.०० या वेळेत सर्व शाळा, महाविद्यालयांमार्फत आपल्या-आपल्या प्रभागात विद्यार्थ्यांची मतदान जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे. याच दिवशी सकाळी १०.०० वाजता पालक सभा घेऊन मतदानाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

## लोकमान्य विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती दि.४ :** येथील लोकमान्य विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती नुकतीच उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य रुपचंद धारणे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य प्रफुल्ल वटे, पर्यवेक्षक आशुतोष सुरावार, ज्येष्ठ शिक्षिका प्रिया भास्करवार प्रभृती मंचावर उपस्थित होते.सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य रुपचंद धारणे यांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. त्यानंतर सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या जीवनकार्याची माहिती दिली. तसेच कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या प्रिया भास्करवार यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट उपस्थित विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. तर आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य धारणे यांनी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांचा आदर्श डोळयांसमोर ठेवून आपल्या आयुष्यात यशस्वी व्हावे असे आवाहन केले.कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन शिक्षिका अश्विनी कवरासे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# शिक्षकांना ज्ञानदानाचेच कार्य करू द्या : आ.सुधाकर अडबाले

## विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे चंद्रपूर जिल्हा अधिवेशन



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.४ :** शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव कटिबद्ध असून अशैक्षणिक कामांतून शिक्षकांची मुक्तता करून त?यांना ज्ञानदानाचेच कार्य करू द्यावे, असे प्रतिपादन आमदार सुधाकर अडबाले यांनी केले. ते चंद्रपूर येथे ४ जानेवारी २०२५ रोजी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने प्रियदर्शिनी सभागृह येथे आयोजित जिल्हा अधिवेशनात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज?य माध्यमिक शिक्षक महामंडळ मुंबईचे सरचिटणीस तथा माजी आमदार विश्वनाथ डायगव्हाणे होते. उद्घाटक म्हणून आमदार ॲड. अभिजित वंजारी होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, विमाशि संघाचे अमरावती शिक्षक मतदार संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू, विज?युक?टाचे महासचिव डॉ. अशोक गव्हाणकर, जगदीश जुनघरी, विमाशि संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, विभागीय कार्यवाह चंद्रशेखर रहांगडाले, कोषाध्यक्ष भूषण तल?हार, लक्ष्मणराव धोबे, डॉ. संजय गोरे, प्रविण नाकाडे, डॉ. प्रवीण जोगी, अरविंद राऊत, विनोद पिसे, प्रा. प्रमोद उरकुडे, अनिल गोतमारे, विजय गोमकर, अविनाश बडे, रवींद्र नैताम, महेंद्र सालंकार, आश्रमशाळा संघटनेचे जिल?हाध्यक्ष दिनेश चौधरी, कार्यवाह किशोर नगराळे, पांडुरंग भालशंकर, भाऊ गोरे, सुरेशकुमार बरे, मनोज आत्राम, प्रमोद साळवे, चेतन हिंगणेकर, चंद्रपूर जिल्हाध्यक्ष सुनील शेरकी, जिल?हा कार्यवाह दीपक धोपटे व मोठ्या संख्येने शिक्षकांची उपस्थिती होती.

या अधिवेशनात जुनी पेन्शन योजना लागू करणे, १०-२०-३० योजना माध्यमिक शाळेतील शिक्षकांना लागू करणे, टीईटी संदर्भातील सर्वोच्च न्यायाच्या निर्णयाबद्दल शासनाशी पाठपुरावा करणे, निवड श्रेणी विनाअट लागू करणे, यासह आश्रमशाळा शिक्षकांच्या समस्या, अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षकांच्या समस्या तसेच विधान परिषदेच्या माध्यमाने शासनाशी केलेला पाठपुरावा याविषयी आमदार सुधाकर अडबाले यांनी मार्गदर्शन केले.उद्घाटनीय भाषणात आमदार ?ड. अभिजित वंजारी यांनी शिक्षण विभागातील प्रश्न हाताळण्याकडे शासनाचे अक्ष्यम दुर्लक्ष होत असल्याचे मत व्यक्त केले. विमाशी संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू यांनी टप्पावाढ अनुदान, जुनी पेन्शन योजना यावर मत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात डायगव्हाणे यांनी विमाशी संघटनेने सुरवातीपासून शिक्षकांच्या हितासाठी आंदोलने केली. तसेच निष्क्रिय शासन धोरणाविरोधात आपला लढा तीव्र करू, असे मत व्यक्त केले.

अधिवेशनात सेवानिवृत्त शिक्षक - कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन जिल?हा उपाध्यक्ष आनंद चलाख, मनीषा बोरगमवार यांनी केले.

दैनिक युवाराष्ट्र दर्शन
# यवतमाळ जिल्हा
३
सोमवार, ५ जानेवारी २०२६

## पुसद येथे घराला भीषण आग, कुटुंब उघड्यावर

•युवाराष्ट्र दर्शन पुसद, प्रतिनिधी, दि.४ जानेवारी

माळ पठारावरील तालुक्यातील खंडाळा अमृतनगर येथे एका घराला आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाले. ही घटना शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. सुदैवाने या घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नाही. शेख असलम शेख इरफान (वय ४५) असे नुकसानग्रस्ताचे नाव आहे. आगीत सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम, घरातील फर्निचर व इतर साहित्य जळून खाक झाले. शेख असलम शेख इरफान हे कामगार असून, त्यांच्या कुटुंबातील इतर पुरुष मंडळी कामानिमित्त दिग्रस येथे मुक्कामी दिग्रस गेले होते. आगीचा प्रकार लक्षात येताच नागरिकांनी धाव घेऊन आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. पुसद येथील अग्निशमन दलालाही पाचारण करण्यात आले होते. परंतु तोपर्यंत लाखोंचे साहित्य जळून खाक झाले. या घटनेमुळे कुटुंब उघड्यावर आले आहे.

युवाराष्ट्र दर्शन
-: कार्यालयीन पत्ता :-
गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१
-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### कु-हाडीने हल्ला

दिग्रसः तालुक्यातील गांधी नगर परिसरात शेतातून काम करून परतणा-या एका ५० वर्षीय मजुरावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. फिर्यादी बाबुसिंग रामचंद्र पवार हे २ जानेवारी रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास शेतातून घरी परतत होते. यावेळी आरोपी गरदार चंदू पवार (वय ३०) याने 'तू शेताकडे का आला होतास?' असा जाब विचारत वाद घातला. रागाच्या भरात आरोपीने हातातील लोखंडी फावड्याने फिर्यादीच्या उजव्या कमरेवर प्रहार करून त्यांना जखमी केले. तसेच शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी दिग्रस पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### प्रतिबंधित तंबाखू जप्त

पुसदः मानवी आरोग्यास घातक असलेल्या प्रतिबंधित अन्नपदार्थांची छुप्या पद्धतीने विक्री करणाऱ्यांविरुद्ध वसंतनगर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. मधुकर नगर परिसरात आरोपी शेख जाकीर शेख इस्माईल (वय ५२) हा स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी कर्करोगासारख्या आजारांना निमंत्रण देणारा तंबाखूजन्य पदार्थांचा साठा करून विक्री करत होता. अन्न सुरक्षा अधिकारी अमित कुमार उपलप यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी छापा टाकून ३६,९२५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### भररस्त्यात अडवून तरुणाला लुटले

उमरखेडः शहरातील सत्यनारायण ऑईल मिलसमोर एका तरुणाला दगडाने मारहाण करून त्याच्याकडील रोख रक्कम पळवल्याची धक्कादायक घटना ३१ डिसेंबर रोजी घडली. फिर्यादी शेख अबुबकर शेख रहीम हे जात असताना आरोपी शेख फरीद शेख ख्वाजा याने त्यांना रस्त्यात अडवले. आरोपीने हातातील दगडाने फिर्यादीच्या डाव्या कानामागे, कोपर आणि बरगडीवर मारून गंभीर जखमी केले. मारहाण केल्यानंतर आरोपीने फिर्यादीची गचांडी धरून त्यांच्या खिशातील १०,००० रुपये जबरदस्तीने काढून घेतले. या जबरी चोरीप्रकरणी उमरखेड पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास अधिकारी अधिक माहिती घेत आहेत.

### पांढरकवड्यात बंद घर फोडण्याचा प्रयत्न

पांढरकवडा: शहरात घरफोडीच्या घटनांचे सत्र सुरूच असून, एका बंद घराचे कुलूप तोडून चोरी करण्याचा अयशस्वी प्रयत्न अज्ञात चोरट्यांनी केला आहे. फिर्यादी युसुफ हारुण नगरीया हे घरी नसताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाची लोखंडी साखळी आणि इतर लॉक तोडून आत प्रवेश केला. घरातील तिजोरीला पासवर्ड लॉक असल्याने चोरट्याने प्लायवूड कव्हर तोडण्याचा प्रयत्न केला, मात्र तिजोरी उघडता आली नाही. सुदैवाने घरातून कोणताही मुद्देमाल चोरीला गेला नाही. याप्रकरणी पांढरकवडा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध घरफोडीच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला असून परिसरात भीतीचे वातावरण आहे

# बोगस बंगाली डॉक्टरांची गर्भपातापर्यंत मजल

## दिग्रस तालुका आरोग्य विभाग कुंभकर्णी झोपेत

•युवाराष्ट्र दर्शन विलास निकम, दिग्रस तालुका प्रतिनिधी, दि. ४

तालुक्यातील ग्रामीण जनतेच्या आरोग्याची नाडी बोगस बंगाली डॉक्टरांच्या हाती सापडली आहेच. शिवाय सर्दी, खोकल्यावर उपचार करणाऱ्या या बंगाली बोगस डॉक्टरांची मजल थेट गर्भपातापर्यंत गेल्याची चर्चा आहे. विनापरवाना थाटलेल्या बोगस दवाखान्यात हे बंगाली डॉक्टर थेट गर्भपातासारखे बेकायदेशीर धंदे करत असून या बंगाल्यांच्या जीवघेण्या कारनाम्यांकडे दिग्रस तालुका आरोग्य विभागाचे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष असल्याची चर्चा आहे. दिग्रस तालुक्यात किमान १५ ते २० बोगस डॉक्टर आपले दवाखाने थाटून गोरगरीब रुग्णांची खुलेआम पिळवणुक करीत आहेत. दीग्रस तालुका आरोग्य विभागाच्या आशीर्वादाने बोगस डॉक्टरांचे दवाखाने सुरू असून या बोगस डॉक्टरांकडून दरमहा लाखो रुपयांची 'पानसुपारी' दिग्रस तालुका आरोग्य विभागातील काही जणांना मिळत असल्याचा आरोप होत आहे. कुठलीही अधिकृत वैद्यकिय पदवी नसलेले अनेक भामटे गावखेड्यात डॉक्टर म्हणून व्यवसाय थाटून बसले आहेत. यात बोगस बंगाली डॉक्टरांचे प्रमाण लक्षणीय आहे. थातुरमातूर वैद्यकिय माहिती असलेले हे कथित डॉक्टर खुलेआम दवाखाने थाटून बसले असून या भोंदू डॉक्टरांच्या अघोरी उपचारामुळे रुग्णांचे आरोग्य डावावर लागले आहे. कुठलीही डिग्री किंवा डिप्लोमा नसलेले बोगस बंगाली डॉक्टर दिग्रस तालुक्यातील ग्रामीण रुग्णाच्या जीवाशी खेळ करीत आहेत. तालुका वैद्यकिय अधिकारी आणि त्यांची यंत्रणा मात्र बोगस डॉक्टरांच्या ताटाखालचे मांजर झाल्याने दीग्रस तालुक्यात आरोग्य सेवा 'सलाईनवर' आली आहे. ताप, डोकेदुखी, सर्दी-



पडसा अशा फुटकळ आजारात रुग्णाकडून शे-दोनशे कमावणाऱ्या या बंगाली डॉक्टरांनी आता गर्भपातासारखे अघोरी उपचार सुरू केले आहेत. गर्भपात करण्यासाठी मेफिप्रिस्टोन, मिसोप्रोस्टॉल या सारखी महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेली औषधे वापरून अवैद्य गर्भपातासारखे जीवघेणे प्रयोग करून तालुक्यातील काही बोगस डॉक्टर लाखो रुपयांची माया गोळा करत आहेत. मेफिप्रिस्टोन, मिसोप्रोस्टॉल या सारखी औषधे वापरण्याची किंवा प्रिस्क्राइब करण्याची संमती केवळ एमबीबीएस, एमडी गायनोलॉजिस्ट आणि एमबीबीएस डीजेओ डॉक्टरांनाच आहे. या तज्ज्ञ डॉक्टरांना सुद्धा मेफिप्रिस्टोन, मिसोप्रोस्टॉल या सारख्या औषधांचे पूर्ण विवरण ठेवावे लागते. याशिवाय कुठल्या पेशंटला ही औषधी प्रिस्क्राईब केली त्याचा अहवाल ड्रग ऑफिसला द्यावा लागतो. होलसेलर औषधी विक्रेत्यांकडून अशी गर्भपाताची औषधे मेडिकल स्टोअर्सला सुद्धा पूरविली जात नाहीत. मग बोगस बंगाली डॉक्टरांकडे ही औषधे कुठून उपलब्ध होतात हा संशोधनाचा विषय आहे. परप्रांतात अत्यंत कमी किमतीत मिळणारी ही औषधे काळ्या बाजारात विकत घेऊन येथील पेशंटवर त्याचे जीवघेणे प्रयोग करण्याचा धंदा बंगाली डॉक्टरांनी सुरू केला आहे. या शिवाय ट्रॅमॅडॉल सारखे नार्कोटिक पेनकिलर वापरून हे बोगस बंगाली डॉक्टर रुग्णांचा जीव धोक्यात टाकत आहेत. तिवरी हे बोगस बंगाली डॉक्टरांच्या संघटनेचे मुख्यालय झाले असून संघटनेच्या माध्यमातून पैसे गोळा करून आरोग्य विभागाला मॅनेज करण्यात हे म्होरके पटाईत आहेत. या बोगस बंगाली डॉक्टरांकडे मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित पेन किलर औषधे व कॉर्टिको स्टिरॉईड औषधे मोठ्या प्रमाणात साठवलेली असतात. यात बेटामेथासोन, डेक्झामेथासोन, प्रेडनीसोलोन, मिथाईल प्रेडनीसोलोन, डिप्लाझोकॉर्ट अशा घातक स्टिरॉईड औषधांचा समावेश आहे. तालुका आरोग्य विभागाचे कृपाछत्र लाभल्यामुळे खेडोपाडी बोगस डॉक्टर पावसाळी छत्र्यांसारखे उगवले आहेत. ग्रामीण जनतेच्या अज्ञानाचा व गरजेचा फायदा घेत या बोगस डॉक्टरांनी लाखोची प्रॉपर्टी गोळा केली आहे. तीवरी, आरंभी,मोख, सिंगद, खेकडी, वरांदळी,लाख, वाईमेंडी व अनेक लहान मोठ्या गावात या बोगस डॉक्टरांची जीवघेणी दुकानदारी अहोरात्र सुरू आहे. काहींचा दुचाकीवरून फिरता दवाखाना आहे. मेडिकल कौन्सिलची कोणतीही अधिकृत पदवी नसतांना हे निम हकीम खेडोपाडी रुग्णांवर अघोरी उपचार करत आहेत. नाडी परीक्षा, इंजेक्शन पासून थेट शस्त्रक्रियेपर्यंत या बोगस डॉक्टरांची मजल गेली आहे. बिना ऑपरेशन शर्तीया इलाज अशी जाहिरातबाजी करणारे हे बनावट डॉक्टर रुग्णांच्या आरोग्याशी खेळत आहेत.

### दिग्रस तालुक्यात बोगस मुन्नाभाईचे पीक

तालुक्यात या बोगस मुन्नाभाई एमबीबीएस चे अक्षरशः पीक आले असून तालुका वैद्यकीय अधिकारी आणि त्यांची यंत्रणा एकाही बोगस डॉक्टरवर कारवाई करत नसल्यामुळे आरोग्य विभागाला बोगस डॉक्टरांकडून दरमहा मोठी आर्थिक रसद मिळत असल्याची चर्चा होत आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी यांना या प्रकरणाशी काहीही सोयरसुतक दिसत नाही त्यामुळे वृत्तपत्रात बातम्या येऊनही दिग्रस तालुक्यात एकाही बोगस डॉक्टरवर या वर्षभरात एकही कारवाई झालेली नाही. आता जिल्हाधिकारी यांनीच बोगस डॉक्टरांच्या मुसक्या आवळण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी होत आहे.

# दोन एकरावरील ऊस जळून खाक



•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी ढाणकी, दि. ४ जानेवारी

उमरखेड ग्रामीण अंतर्गत येणाऱ्या चुरमुरा रोड स्थित सुभाष चिकने या शेतकऱ्याच्या शेतातील उसाला ३३ के.व्ही. हाय व्हॉल्ट विद्युत तारांच्या स्पर्शा मुळे दिनांक ३० डिसेंबर रोजी दुपारी ऊसावर ठिणगी पडल्यामुळे उस जाळल्याची घटना घडली आहे. एम.एस.ई.बी ढाणकी च्या चुकीमुळे शेतकऱ्याचा हाता तोंडाशी आलेला घास हिरावून गेल्यामुळे शेतकरी सुभाष चिकणे यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. याबाबत त्यांनी यासंदर्भात लेखी तक्रार दिली आहे.

सदर शेतकऱ्याच्या शेतातुन ढाणकी एम. एस. ई. बी ची ३३ के. व्हीं. विद्युत तार जमिनीपासून अगदी १०-१२ फुटावरून जात आहे. नियमाप्रमाणे ३३ के.व्ही. तार उंचीवर असले पाहिजे. या घटने पुर्वी शेतमालक सुभाष चिकने यांनी वारंवार तक्रार देखील केली होती. परंतु या तक्रारीची दखल घेण्यात आली नसल्यामुळे ही वेळ आल्याची शेतकऱ्याचा आरोप आहे. भविष्यात या विद्युततारामुळे घटना घडू नये यासाठी विद्युत महामंडळाने ताबडतोब उंची वाढवावी व झालेली आर्थिक नुकसान भरपाई द्यावी अन्यथा तीव्र आंदोलनाचा ईशारा शेतकरी सुभाष चिकने यांनी दिला आहे.

" एम.एस.ई.बी. ढाणकी च्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्याचा २ लाखा चा ऊस जळाला. याबाबत कायदेशीर करवाई करून त्या शेतकऱ्याला झालेला आर्थिक नुकसान मिळवून देणार "
-शाहरुख पठाण
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
उमरखेड

# उपेक्षित मुलींना शालेय साहित्याचे वाटप

## नवनिर्वाचित नगराध्यक्षांची उपस्थिती

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ, दि. ४ जानेवारी

महिलांचे अधिकार सुधारण्यात व महिलांसाठी शिक्षणाचे दारे उघडे करून देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती संपूर्ण देशात साजरी होत असतांना, संकल्प फाउंडेशनच्या वतीने वाघाडी स्थित आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी ह्या प्रकल्पावर उपेक्षित समाजातील मुलींना शालेय साहित्य व नोटबुक वितरित करून साजरी करण्यात आली.

विशिष्ट समाजातील अनाथ व उपेक्षित असलेल्या मुलींचा सांभाळ करणाऱ्या इशू माळवी व पपीता माळवी यांच्या कल्पनेतून साकार झालेल्या आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी येथे



निवासी असलेल्या 55 मुलींना आज सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने व नुकत्याच पार पडलेल्या यवतमाळ नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या उच्चशिक्षित अ‍ॅड. कु. प्रियदर्शनी उईके यांच्या शुभहस्ते या शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी महिला मंचावर रेखाताई कोठेकर, संकल्प वनिता वाहिनीच्या महिला प्रमुख अंजली फेंडर, स्वतः नवनिर्वाचित नगराध्यक्षांच्या मातोश्री बिना अशोक उईके, शैला मिर्झापुरे, निर्मला विनकरे उपस्थित होत्या. यावेळी प्रकल्पावरील चिमुकल्या विद्यार्थिनी सोबत संवाद साधतांना शिक्षणाचे महत्त्व, सावित्रीबाई फुले यांचा महिलांसाठींचा त्याग, मुलींसाठी यवतमाळ शहरांमध्ये राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती आपल्या मनोगतातून नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संकल्प फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष प्रलय टिप्रमवार यांनी तर आभार प्रदर्शन संकल्प वनिता वाहिनीच्या सहसचिव पूनम शेंडे यांनी केले. उपरोक्त कार्यक्रमाकरिता संकल्प वनिता वाहिनीच्या उपाध्यक्षा ज्योती डब्बावार, संगीता टिप्रमवार, मनीषा मानकर, सविता शेंडे, अंतकला पेंदोर, भांगे, सहित संकल्प फाउंडेशनचे उपाध्यक्ष अनिल तांबेकर, सहसचिव रवी माहुरकर, रवी ठाकूर, गणेश शेंडे, सुनील चव्हाण, महादेव काचोरे,सिद्धार्थ मुजमुले उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांची पोलिस स्टेशनला क्षेत्रभेट

## पोलिस ठाण्यात रायझिंग डे : ठाणेदार शिवप्रकाश मुळे यांनी केले मार्गदर्शन

•युवाराष्ट्र दर्शन दारव्हा ता.प्रतिनिधी, दि.४ जानेवारी

पोलीस दलाच्या शौर्य व कार्याला सलाम करण्यासाठी साजरा करण्यात येणाऱ्या पोलीस रायझिंग डे निमित्ताने नगरपंचायत उच्च प्राथमिक मराठी शाळा, दारव्हा येथील विद्यार्थ्यांनी दारव्हा पोलीस स्टेशन ला अभ्यासपूर्ण भेट दिली. यावेळी सर्वप्रथम ठाणेदार शिवप्रकाश मुळे यांचे शाळेच्या वतीने आभार मानण्यात आले. याप्रसंगी नगर परिषद दारव्हाचे प्रशासन अधिक तथा शाळेचे मुख्याध्यापक रमेश राठोड , नगरसेवक संतोष येडमे, मयुर अजमिरे, राम मते, महेश गावंडे , अक्षय मांगे , प्रशांत राठोड'



युगेश्वरी बदुकले ,यादव व इयत्ता ९ वीचे विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी दारव्हा पोलीस स्टेशनचे ठाणेदार शिवप्रकाश मुळे, राठोड व पोलीस बांधवांनी मार्गदर्शन केले. या भेटीदरम्यान पोलीस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना विविध शस्त्रास्त्रांची सविस्तर माहिती दिली. शस्त्रांचे प्रकार, त्यांचा उपयोग आणि सुरक्षिततेचे नियम याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने प्रश्न विचारत ही माहिती समजून घेतली. त्यानंतर विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्याचा प्रत्यक्ष कारभार कसा चालतो, गुन्ह्यांची नोंद, तपास प्रक्रिया, पोलीस प्रशासनाची रचना याबद्दलही माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनमधील विविध महत्त्वाच्या विभागांना भेट देण्याची संधी मिळाली. पोलीस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना पुढील ठिकाणी प्रत्यक्ष नेऊन माहिती दिली शाळेच्या मुख्याध्यापकांनी व शिक्षकवर्गाने या उपक्रमाचे आयोजन केले होते. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणारा तसेच पोलीस-विद्यार्थी संवाद वाढवणारा ठरला.विद्यार्थ्यांनी पोलीस दलाच्या कार्याचे कौतुक करत अधिकाऱ्यांचे आभार मानले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशसेवा व शिस्त याबद्दल सकारात्मक प्रेरणा निर्माण होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# निलोफर साजिद बेग गटनेतेपदी बिनविरोध



•युवाराष्ट्र दर्शन तालुका प्रतिनिधी आर्णी परवेज बेग, दि. ४ जानेवारी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या आर्णी नगर परिषदेतील नवनीर्वाचित गटनेतेपदी निलोफर साजिद बेग यांची बिनविरोध निवड करण्यात आला आहे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) पक्षातील सर्व नगरसेवकांनी एकमताने निलोफर बेग यांच्यावर विश्वास व्यक्त करत गटनेतेपदी निलोफर बेग यांची निवड करण्यात आली.

या गटनेतेपदी निवडीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व नवनियुक्त नगरसेवक उपस्थित होते. निलोफर बेग या सामाजिक कार्यात सक्रिय असून समन्वयाच्या जोरावर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. त्यांच्या निवडीमुळे पक्ष संघटन अधिक मजबूत होईल तसेच आर्णी शहरातील नागरिकांच्या समस्या प्रभावीपणे मार्गी लागतील, अशी अपेक्षा पक्षाच्या नगरसेवकासह पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

"ही निवड केवळ माझी नसून आर्णीतील जनतेचा विश्वास आणि माझे पती साजिद बेग यांच्या मार्गदर्शनामुळे मिळालेल्या यशाचे फलित आहे. आठ जागांवर मिळालेला विजय हा जनतेच्या अपेक्षांचा कौल आहे. शहराच्या विकासासाठी सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन निष्ठेने काम करेन," अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित गटनेते निलोफर साजिद बेग यांनी व्यक्त केली

# सावित्रीच्या लेकींची उद्बोधन कार्यशाळा व सन्मान सोहळा

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ, दि. ४ जानेवारी

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, जिल्हा शाखा यवतमाळ यांच्या वतीने "सन्मान कर्तृत्वाचा" या उपक्रमांतर्गत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी "सावित्रीच्या लेकींची उद्बोधन कार्यशाळा व सन्मान सोहळा" अत्यंत उत्कृष्ट, बहारदार व आदर्शवत वातावरणात पार पडला. दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी सहकार भवन, आर्णी रोड, यवतमाळ येथे आयोजित या कार्यक्रमात उमरखेडपासून ते झरी-जामणीपर्यंत यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या सर्व सोळा पंचायत समितींमधील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सावित्रीच्या लेकी – सहाय्यक



शिक्षिका, तसेच नुकत्याच पदोन्नती मिळालेल्या सन्माननीय केंद्रप्रमुख सावित्रीच्या लेकींच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. यासोबतच राज्यस्तरावर विशेष व उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिला, तसेच महिला क्रिकेट विजेता व उपविजेता संघाचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन अ‍ॅड. प्रियदर्शनीताई अशोकराव उईके नवनिर्वाचित नगराध्यक्षा, नगरपरिषद यवतमाळ यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय कोंबे, राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी "Right to Disconnect" या संकल्पनेवर प्रकाश टाकत ऑनलाइन कामाच्या वाढत्या ताणातून कौटुंबिक व वैयक्तिक आयुष्याचे संतुलन राखण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शिल्पा पोलपेल्लीवार उपशिक्षणाधिकारी प्राथमिक, जि. प. यवतमाळ, मधुमती सांगळे अधिव्याख्याता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ व प्रणिता गाढवे विस्तार अधिकारी, शिक्षण, जि. प. यवतमाळ उपस्थित होत्या. प्रमुख वक्त्या सुप्रभा यादगीरवार माजी प्राचार्य अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ यांनी मार्गदर्शन केले. डॉ. हितेशा भंडारी टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई यांनी कॅन्सरसह विविध आजारांविषयी कारणे, लक्षणे व प्रतिबंध यावर सविस्तर माहिती दिली. डॉ. श्रीकांत मेश्राम मानसोपचार तज्ज्ञ यांनी मार्गदर्शन केले. यानंतर सर्व सन्माननीय केंद्रप्रमुख सावित्रीच्या लेकी, राज्यस्तरावर विशेष कामगिरी करणाऱ्या महिला, महिला क्रिकेट विजेता व उपविजेता संघ, तसेच उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान सोहळा पार पडला. या सन्मान सोहळ्याचे सूत्रसंचालन शुभदा येवले, महिला जिल्हा कार्याध्यक्ष यांनी केले. त्यानंतर तालुकानिहाय उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सावित्रीच्या लेकींचा स्वतंत्र सन्मान सोहळा पार पडला. या सत्राचे सूत्रसंचालन कुमुद डाखोळे, महिला संघटक यांनी केले.

कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचालन नीलिमा पाटील, महिला जिल्हा कोशाध्यक्ष यांनी केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी शालिनीताई शिरसाठ, महिला जिल्हा सरचिटणीस यांनी आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर ज्ञानेश्वर नाकाडे जिल्हा नेते, प्रफुल्ल पुंडकर राज्य नेतृत्व, जुनी पेन्शन आघाडी, पुंडलिक रेकलवार जिल्हाध्यक्ष, गजानन देऊळकर शिक्षक नेते, सुनीता जतकर, शालिनी शिरसाठ, महेश सोनेकर अध्यक्ष यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था तसेच तालुकाध्यक्ष, राळेगाव, गणेश देऊळकर, विलास भड, आशन्ना गुंडावार, विजय लांडे, रामकृष्ण केंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते. हा डोळ्यांचे पारणे फेडणारा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष पुंडलिक रेकलवार, प्रफुल्ल पुंडकर, संदीप मोहाडे, सुभाष पारधी, अमोल माळे, विनोद क्षीरसागर, उमेश बुटले, अभिजित नवलकर, संभाजी निंबाळकर, दशरथ सूर्यवंशी, शंकर मेथाडे, रवींद्र नंदुरकर, गणेश भगवत, गजानन गिरी, अरविंद दहापुते, अमर गुजर, तसेच संपूर्ण युवा टीम, महिला जिल्हा आघाडी – नीलिमा पाटील, शुभदा येवले, कुमुद डाखोळे व सर्व पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.



## मानकी ग्रां.पं.कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. ४ जानेवारी

वणी पंचायत समिती अंतर्गत मौजा मानकी येथील ग्राम पंचायत कार्यालय येथे दिनांक ०३ जानेवारीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती सकाळी ८:३० वाजता साजरी करण्यात आली.

यावेळी सरपंच कैलास पिपराडे, उपसरपंच शंकर माहुरे, ग्राम पंचायत सदस्य नानाजी पारखी, सदस्या सौ. इंदिरा परशुराम पोटे , पोलीस पाटील सौ. मिनाक्षी सुजीत मिलमिले, अंगणवाडी सेविका सौ. बेबिताई मालेकर, सेविका सुनिता पत्रकार, ग्राम पंचायत कर्मचारी अविनाश सरवर, अमर खुसपुरे, प्रदिप मालेकर व बालगोपाल उपस्थित होते.

४ युवाराष्ट्र दर्शन
# गोंदिया
जिल्हा
सोमवार, ५ जानेवारी २०२५

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६
**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

# गोंदिया कोहमारा मार्गावर सीएनजी सिलेंडरने भरलेला ट्रेलर उलटला ; गॅस लीक

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**गोंदिया :** सीएनजी सिलेंडर भरलेले ट्रेलर रस्त्याच्या मधोमध उलटून सिलिंडर मधून गॅस लिक झाल्याची घटना शनिवारी ३ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास गोंदिया-कोहमारा राष्ट्रीय राज्य महामार्गावरील मुरदोली जंगल शिवारातील वाघदेव देवस्थान परिसरात घडली.

मिळालेल्या माहितीनुसार रिलायन्स कंपनीचे सीएनजी सिलेंडर गोंदिया येथे रिकामे करून रिकामे सिलेंडर ट्रेलर क्रमांक एम एच २७ डीटी १७०० मध्ये कोहमारा मार्गे नागपूरकडे घेऊन जात असताना गोंदिया -कोहमारा मार्गावरील मुरदोली जंगल शिवारात वाघदेव देवस्थान परिसरात चालकाचे वाहनावरून नियंत्रण सुटले. यावेळी अनियंत्रित ट्रेलर रस्त्याच्या मधोमध उलटले. त्यामुळे ट्रेलर मध्ये ठेवलेला एक सिलेंडर लीक झाला. सुदैवाने सिलेंडरध्ये थोडीफार सीएनजी असल्याने मोठा अपघात टळला. या अपघातात चालक किरकोळ जखमी झाल्याची माहिती असून ट्रेलर रस्त्याच्या मधोमध उलटल्याने काही काळासाठी महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

त्यामुळे महामार्गावर दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. घटनेची माहिती मिळताच गोंदिया येथील आपत्ती



व्यवस्थापन विभागाचे पथक, गोरेगाव व सडक अर्जुनी येथील अग्निशमन विभागाचे पथक व गोरेगाव पोलिसांनी घटनास्थळ गाठून जमावाला घटनास्थळापासून दुर केले व रिलायन्सचे टेक्निकल पथक, बीपीएचसीएल, एचपीसीएल, एलपीजी ऑईल मार्केटिंग कंपनीचे टेक्निकल पथक यांना माहिती देण्यात आली. दरम्यान, संबंधित पथकांनी घटनास्थळी दाखल होत परिस्थिती नियंत्रणात आणली. विशेष म्हणजे, सदर सिलेंडर रिकामे असले तरी त्यात काही प्रमाणात गॅस व केमीकल राहत असून अपघातात शॉट सर्कीट किंवा आग लागली असती तर मोठा अपघात घडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. बातमी लिहीपर्यंत घटनेची नोंद झालेली नव्हती.

# मुरदोली जंगलात चारचाकी झाडावर आदळली, एकाचा मृत्यू, एक गंभीर जखमी



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**गोरेगाव :** येथील पोलीस स्टेशन अंतर्गत येणा-या मुरदोली जंगलात गोंदिया ते कोहमारा महामार्गावर शनिवार (ता ०३) सकाळी साडेनऊ च्या दरम्यान चारचाकी सुझुकी डिझायर एम.एच.३५ ए. जी.३९५८ हे वाहन झाडाला धडक होऊन उलटल्याने एकाचा जागीच मुत्यू झाला.तर दुसरा गंभीर जख्मी झाल्याने गोंदिया येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मूतकाचे नाव रुपेश नरेश भुगारे वय २३ वर्ष रा.पिंडकेपार (गोरेगाव) व जख्मीचे नाव प्रफुल्ल ब्रम्हानंद पटले वय २२ वर्ष रा तुमखेडा असे आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार गोरेगाव कोहमारा मुख्य मार्गाने चारचाकी वाहन भरधाव वेगाने कोहमाराकडे जात असतांना मुरदोली जंगलात चालकाचे स्टेयरिंग वरुन नियंत्रण सुटल्याने वाहनाने एका झाडाला धडक देत दुसऱ्या झाडाला आपटून उलटली. यात एकाचा मूत्यू व दुसरा जख्मी झाला. धडक इतकी भीषण होती की वाहनाचा समोरचा भाग पूर्णतः चुराडा झाला.

अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी घटनास्थळी फॉरेन्सिक पथक बोलावण्यात आले होते. पुढील तपास सुरू असल्याची माहीती पोलीस उपनिरीक्षक सुजित घोलप यांनी दिली आहे.

# आनंद मेळाव्यातून चिमुकल्याणी फुलवली बाजारपेठ

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**देवरी :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोहगाव येथे वर्ग १ ते ४ शाळा असून शाळेच्या वतीने आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या आनंद मेळाव्यात शालेय विदयार्थ्यांनी सहभाग घेत जणूकाही मोहगावात मिनी बाजारपेठ भरली की काय? अशी तेथील वातावरण निर्मितीतुन पहावयास मिळाली. या आनंद मेळाव्यासाठी शाळेतील शिक्षक एच एस साखरे, कुसन कुंभरे यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच या आनंद मेळाव्याला गावातील नागरिकानी भरभरून साद दिली व विध्यार्थ्यांच्या कला गुणांची स्तुती केली.

यावेळी गावातील चुंनीलाल हुर्रे माजी पोलीस पाटील, गिरीश हुर्रे,बाजीराव ऊईके, श्यामराव ऊईके, संतराम अडभैय्या, हिरालाल उईके, शिलाबाई उईके, सुंदर बाई अंबादे, भागनबाई राऊत, राजकुमार वाले, शेंडे मॅडम, अल्केश भैसारे, राजेंद्रकुमार गंगभोईर, वातुजी ऊईके, नकुल गुरुपंच, संतोष वालदे, मीनाक्षी टेंभुर्णे, कांताबाई लाडे, मीनाक्षी उईके, अनिता उईके, वनिताबाई मडावी, नंदलाल उईके इत्यादी उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**अर्जुनी/ मोर :** श्री गणेश बहुउद्देशीय संस्था अर्जुनी मोर द्वारा संचालित जयदुर्गा जुनिअर कॉलेज गौरनगर च्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचं उद्घाटन दिनांक २ जानेवारी २०२६ ला ग्राम कोरंभी येथे संपन्न झाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील कुमार पाऊलझगडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. नाजूक कुंभरे पंचायत समिती सदस्य यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी सेवाभाव त्याग दर्शवितो , निस्वार्थ भाव दर्शवितो .



शिबिराच्या माध्यमातून मिळालेल ज्ञान संचयी ठेवून आपला व्यक्तित्व विकास साधावा असे आवाहन याप्रसंगी डॉ. नाजूक कुंभरे यांनी विद्यार्थ्यांना केले . याप्रसंगी प्रमुख अतिथि म्हणून गावचे सरपंच सुनीलजी टेंभुर्णे, नेपाल जी शेंडे उपसरपंच , ग्रामपंचायत अधिकारी चंद्रशेखर हलाले तथा सर्व ग्रामपंचायत सदस्य कोरंभी , जी एस कापगते मुख्याध्यापक जि. प. प्रा शाळा कोरंभी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष चंदन सेलोकर कोरंभी हे होते. कार्यक्रम प्रसंगी गावाच्या सर्व बचत गटाच्या महिला व ग्रामवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सात दिवसीय शिबिरामध्ये योग प्राणायाम , श्रमदान, विविध विषयांवर मार्गदर्शन सोबतच रक्तदान शिबिर तसेच रोगनिदान. शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. संघदिप कांबळे यांनी केले तर संचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी भूवेंद्र चव्हाण यांनी केले व सहा. शिक्षक दिलीप लोधी यांनी मान्यवरांचे आभार मानले.

# ग्रामपंचायत कार्यालय जांभळी येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**सडक/ अर्जूनी :** तालुक्यातील जांभळी दोडके येथील ग्रामपंचायत कार्यालयात आज सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. जयंती कार्यक्रमाचे अध्यक्षता ग्रामचे सरपंच रंजीता ताई कोराम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले यावेळी अंगणवाडी सेविका वैशाली बोपचे. मंजू ताई उईके अंगणवाडी सेविका. विजू ताई सोनवांणे. आरती उके.शिल्पा लटये.मंदा कुतिरकर .शीलाताई सोनवणे. कुंदाताई कावळे. विमलेश्वरी कावळे .रेखाताई बहेकार. मीना पालेवार मंदिराबा. ई वाळवे .वचलाताबाई कोचे. धनवंता बाई मटाले,. रोशनी ताई कावळे. मनोज भाऊ राऊत. रामेश्वर भाऊ मेंढे आणि ग्रामचे महिला मंडळ कार्यकर्त्या आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थितीत हा जयंती सोहळा पार पडला.

# १ १ २ वर कॉल करा व पोलिसांची मदत मिळवा : निरीक्षक अमित वानखेडे

## भिवरामजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वडेगाव येथे पोलीस वर्धापन दिनानिमित्त मार्गदर्शन कार्यक्रम

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**तिरोडा :** भिवरामजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वडेगाव येथे पोलीस वर्धापन दिनानिमित्त मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन प्रतिभा शिक्षण संस्थेचे सचिव पंकज चौधरी यांचे अध्यक्षतेखाली प्रमुख मार्गदर्शक पोलीस निरीक्षक अमित वानखडे, प्राचार्य डी आर गिरीपुंजे, उद्योजक सौरभ हाडके यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम साजरा करण्यात आला.

यावेळी पोलीस निरीक्षक अमित वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडिया, चाट जीपीटी, ए आय ,फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप ,मेटा ,जेमिनी या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. माणसाची फसवणूक कशी होते, सोशल मीडियाच्या वापर कसा




चांगल्या प्रकारे करता येऊ शकतो तसेच विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी मोबाईलच्या वापर कसा करावा यावर सविस्तर मार्गदर्शन करून विद्यार्थी व विद्यार्थिनी सुरक्षा याबाबतीत ११२ वर कॉल करा व पोलीस मदत मिळवा असे आवाहन याप्रसंगी केले. यावेळी प्रतिभा शिक्षण संस्थेचे सचिव पंकज चौधरी, प्राचार्य डी आर गिरीपुंजे, उद्योजक सौरभ हाडके यांनीही यथोचित मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे संचालन विवेक बन्सोड तर आभार प्रदर्शन शुभंम टेंभरे यांनी केले कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी ज्येष्ठ अध्यापक गोविंदप्रसाद बिसेन, एस पी भगत ,जे सी लांजेवार, आर एस मेश्राम, ए बी राठोड, एस पी टेंभरे, यु एस बोरकर, एन जी बोरकर, व्ही आर बनसोड, जी एस बिसेन, एन एम अटकुलवाड, व्ही व्ही मेश्राम, एस एम कटरे, ए यु उपरीकर, एस ए वालदे, व्ही आर धावडे , यांनी मोलाचे सहकार्य केले.

# एकलव्य सामान्यज्ञान परीक्षेत विद्यार्थ्यांचे सुयश



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**अर्जुनी/ मोर.:** एकलव्य ज्ञानवर्धिनी बहुउद्देशीय संस्था नागपूर यांच्या तर्फे घेण्यात येणारी एकलव्य सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा ऑगस्ट २०२५ मध्ये घेण्यात आली होती. त्याचा निकाल १ जानेवारी २०२५ ला घोषित झाला. त्यामध्ये सरस्वती ज्ञानदीप कॉन्व्हेंट व जी.एम.बी. हायस्कूल येथील एकूण ९९ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी प्राविण्य प्राप्त विद्यार्थी , रियान योगेंद्र गौतम, आर्या कृष्णा फुल्लुके, अवंती एन. गायकवाड, सार्थक सुजित जक्कुलवार विधी रेशीम परशुरामकर, फाल्गुनी संतोष बागडे ठरले. प्राविण्य प्राप्त विद्यार्थी तसेच त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक दिलीपकुमार कोटांगले, जितेंद्र शहारे यांना शाळेच्या प्राचार्या शैव्या जैन क्रीडाशिक्षक महेश पालीवाल यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

# माहेश्वरी समाजाचा प्रेरणादायी उपक्रम 'एक संध्याकाळ कुटुंबासाठी'

## श्री विजय शंकरजी मेहता यांच्या ओजस्वी व्याख्यानाने श्रोते भारावले

**आमगाव :** नववर्ष २०२६ च्या पावन पर्वावर माहेश्वरी समाजाच्या वतीने आयोजित 'एक संध्याकाळ – कुटुंबासाठी' हा विशेष कार्यक्रम अत्यंत गरिमामय, भावनिक व प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. सदर कार्यक्रम २ जानेवारी २०२६ रोजी शुभ मंगलम लॉन, सालेकसा रोड येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते, जागतिक कीर्तीचे जीवन व्यवस्थापन गुरू श्री विजय शंकरजी मेहता यांनी आपल्या ओजस्वी, विनोदी व प्रभावी शैलीतून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी हनुमान चालीसेतील ४० चौपायांचे विविध प्रसंग उलगडत कुटुंब, जीवन व्यवस्थापन, शिस्त, समर्पण, कर्तव्यभावना, संस्कार आणि सकारात्मक विचारसरणी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर अतिशय सोप्या, व्यावहारिक व जीवनोपयोगी पद्धतीने मार्गदर्शन केले.

श्री मेहतांनी आपल्या भाषणात सांगितले की, ज्या प्रकारे हनुमान चालीसेतील प्रत्येक ओळ जीवनाला नवी दिशा देऊ शकते, त्याचप्रमाणे कुटुंबातील प्रत्येक सदस्याची भूमिका अमूल्य असते. त्यांच्या विचारांनी लहान मुले, युवक, पालक तसेच ज्येष्ठ नागरिक — सर्वांनाच आत्मचिंतन करण्यास प्रवृत्त केले.

संपूर्ण कार्यक्रमादरम्यान वातावरण अध्यात्मिक, दिव्य व भावनिक होते. श्री मेहता यांच्या प्रेरणादायी विचारांनी उपस्थितांच्या मनावर खोलवर ठसा उमटवला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या समाजबांधवांनी हा कार्यक्रम अविस्मरणीय अनुभव असल्याची भावना व्यक्त केली. इतका गरिमामय, दिव्य व भव्य सोहळा क्वचितच अनुभवायला मिळतो, अशी प्रतिक्रिया अनेकांनी दिली. माहेश्वरी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत, भविष्यातही असे संस्कारक्षम, कुटुंबाला एकत्र बांधणारे व प्रेरणादायी उपक्रम सातत्याने आयोजित करण्याची आवश्यकता व्यक्त केली. हनुमानजींच्या नामस्मरणाने नववर्षाची सुरुवात करत कुटुंबासोबत साजरा केलेल्या या अनोख्या उपक्रमाला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला व मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला.

# मालकीच्या जागेवर आरोपींचा ताबा

**गोंदिया :** ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत सेलटॅक्स कॉलोनी गोंदिया येथे १५ वर्षापासून मालकी ताबा असलेल्या जागेवर चार आरोपींनी ताबा केल्याची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी श्रीराम रहमतकर रा. कारंजा यांचे सेलटॅक्स कॉलोनी येथे प्लाट असून १५ वर्षापासून त्याचा ताबा आहे. मात्र आरोपी मुकेश वाधवानी, हरिष गोपलानी, राहुल यादव व पंकज मिश्रा सर्व रा. गोंदिया यांनी त्या प्लाटवर लोखंडी फलक लावून प्लाट ताब्यात घेवून जीवे मारण्याची धमकी दिली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

# जिल्हा क्रिडा स्पर्धेत नवरगांव कला खो-खो संघ अव्वल

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**गोंदिया :** नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय अटल क्रिडा स्पर्धेत गोंदिया तालुक्यातील नवरगांव (कला)येथील खो-खो चा संघ अव्वल ठरला आहे. नुकतीच जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत जिल्हास्तरीय अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव अर्जुनी मोरगाव तालुक्यातील बोंडगाव देवी येथे पार पडले. गोंदिया तालुक्यातील नवरगाव (कला) येथील जिल्हा



परिषद शाळेच्या मुलांच्या खो-खो संघाने अव्वल स्थान पटकाविले. गावातील मुलांनी जिल्हा स्तरावर प्रथमच अजिंक्य पद पटकाविले आहे. त्यामुळे गावात मिरवणूक काढून विजयी संघाचे कौतुक करण्यात आले. या सांघिक यशासाठी शाळेच्या सर्व शिक्षक वृंदांचे ग्राम पंचायत पदाधिकाऱ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# सरस्वती विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**अर्जुनी मोरगाव:** स्थानिक सरस्वती विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी अध्यक्षस्थानी जी.एम.बी. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्या शव्या जैन, तर प्रमुख उपस्थिती उपप्राचार्या अर्चना गुरूनुले, पर्यवेक्षक शिवचरण राघो?ते, कल्पना भुते, भगीरथ गांधी,महेश पालीवाल, कुंडलिक लोथे, माधुरी वनवे यांची होती. सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. सावित्रीबाई प्रमाणे विद्यार्थ्यांनीही समाजसेवेचा वसा पुढे चालू ठेवावा असे प्रतिपादन आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनातून प्राचार्या शव्या जैन यांनी केले. याप्रसंगी वर्ग पाच ते नऊच्या विद्यार्थिनींनी विविध क्षेत्रात यशस्वी ठरलेल्या महिलांची वेशभूषा करून कार्यक्रम सादर केले. वर्ग दुसरी ते चौथीच्या विद्यार्थिनींनी समूहगीत सादर केले.कार्यक्रमाचे संचालन करून आभार दिपाली गोल्लीवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंदांनी सहकार्य केले.

# बालिका दिन : सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणादायी विचारांचा उत्सव : प्राचार्या शैव्या जैन

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**अर्जुनी/ मोर.:** श्रीमती केशरबाई शिक्षण संस्थाद्वारा संचालित सरस्वती ज्ञानदीप कॉन्व्हेंट व जी एम बी इंग्लिश मीडियम हायस्कूल येथे ३ जानेवारी शनिवारला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती बालिका दिन म्हणून साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या प्राचार्या शैव्या जैन, समन्वयक भगीरथ गांधी, उपप्राचार्या अर्चना गुरनुले,



मुखाध्यापिका कल्पना भुते, पर्यवेक्षक एस. राघोर्ते, क्रीडाशिक्षक महेश पालीवाल, ज्येष्ठ शिक्षक के. लोथे, क्रीडाशिक्षिका माधुरी वणवे, उपस्थित होते.

बालिका दिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये तोशिका दिनेश चानप, लावण्या नरेंद्र गोमासे, ईश्वरी मंगेश गाडेकर हास्यता शैलेश लाडे, मानसी दामोधर गहाणे, राशी अजय मंडल, ईशान्वी विरेंद्र धकाते, श्रावणी दिलीप शहारे, इत्यादी विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. स्त्रियांनी स्वरक्षणासाठी सक्षम होण्यासाठी कार्य करावे असे प्रतिपादन प्राचार्या शैव्या जैन यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मूल्यशिक्षण समिती,सांस्कृतिक समिती, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

युवाराष्ट्र दर्शन
भंडारा जिल्हा
सोमवार दि.०५ जानेवारी २०२६

## घरगुती गॅस सिलेंडरचा तुटवडा, काळ्या बाजारात चढ्या दराने विक्री

**लाखनी :** तालुक्यात एल.पी.जी. गॅस किटवर चालविल्या जात असलेल्या वाहनांसह रेस्टॉरंट व ढाब्यांवर मोठ्या प्रमाणात होत असलेल्या घरगुती गॅस सिलेंडरच्या बेकायदेशीरत्या वापरामुळे लाखनी तालुक्यासह पालांदूर परिसरात घरगुती गॅस सिलेंडरचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा निर्माण झाला असल्याचे चित्र आहे.बुकिंग केल्यानंतर तीन ते चार दिवसानंतरही घरगुती गॅस सिलेंडर मिळत नसल्यामुळे ग्राहक त्रस्त झाले आहेत. तर गॅस एजन्सीज गॅस सिलेंडर वाटप करत असलेल्या ठिकाणावर सकाळपासूनच मोठ्या प्रमाणात ग्राहकांच्या रांगा लागत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.पालांदूर येथील एचपी गॅस एजन्सीच्या गॅस सिलेंडर वाटप ठिकाणावर सकाळपासूनच महिलांसह वृद्ध नागरिकांनी घरगुती गॅस सिलेंडरच्या नंबर करिता रांगा लावलेल्या दिसतात. या उलटच स्थानिक पालांदूरसह लाखनी तालुक्यात मोठ्या प्रमाणात काळ्या बाजारात घरगुती गॅस सिलेंडर चढ्या दराने उपलब्ध होत आहे. शहरासह परिसरामध्ये या सर्वच गॅस एजन्सीच्या छोट्या एजन्सीज दिल्या असून या ठिकाणीही सिलेंडर उपलब्ध होत नसल्यामुळे ग्राहक त्रस्त झाले आहेत.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# वाहनाच्या धडकेत काळवीटचा मृत्यू



युवाराष्ट्र दर्शन/ता.प्रतिनिधी

**तुमसर :** भंडारा तुमसर महामार्गावर खरबी शेतशिवारात अज्ञात वाहनाच्या धडकेत काळवीट (हरीण) गंभीर जखमी झाले मात्र उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला.

तुमसर भंडारा महामार्गावरील शेत शिवारात मोठ्या प्रमाणात हरणीचे वास्तव्य असते.भंडारा तुमसर महामार्ग ओलांडताना या आधी कित्येक हरीण चे अपघाती मृत्यू झाले आहे.४ जानेवारी ला सकाळी खरबी शेत शिवारात तुमसर भंडारा महामार्ग ओलांडताना अज्ञात वाहणाने हरणीला धडक दिली. या अपघातात हरीण गंभीर जखमी झाले होते.

या अपघाताची माहिती एका वाहन चालकाने फोन वरून वन विभागात दिले. घटनास्थळी मोहाडी पोलीस व वन विभागाचे कर्मचारी उपस्थित झाले व हरिणीला उपचारासाठी तुमसर पशु वैद्यकीय रुग्णालयात हलविण्यात आले होते मात्र उपचारा दरम्यान मृत्यू झाला.

तुमसर-भंडारा महामार्गावर वाहनांच्या अवागमनाने वन्य प्राण्यांना रस्ता ओलांडतांना अनेकदा जनावरांना प्राणाला मुकावे लागले आहे. वन विभागाने यावर काही उपाययोजना कराव्या अशी मागणी नागरीकांमधुन होत आहे. याआधीही या ठिकाणी अपघाताने हरणीचे मृत्यू झालेले आहे हे मात्र विशेष.

# बेशिस्त पार्किंगमुळे वाहतुकीस अडथळा

■ रस्त्यावरच असतात वाहने उभी ■ नागरिकांचा जीव टांगणीला

युवाराष्ट्र दर्शन / भंडारा

**तुमसर :** तुमसर शहरातील जामा मज्जीत ते नवीन बस स्थानक मार्गावरील रस्त्यावर बेशिस्तपणे वाहने पार्क केली जातात. तर काही दुकानदारांनी अतिक्रमण केले आहे. चक्क रस्त्यालगत दुकाने लावले जातात. रस्ता अरुंद होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. या प्रकारामुळे लहान-मोठे अपघात सातत्याने होत आहेत. तर-ीही नगरपालिका प्रशासन व वाहतूक पोलिसांकडून बघ्याची भूमिका घेतल्याने संताप व्यक्त केला जात आहे.



नगरपालिकेने शहरात रस्ते विकसित केले आहेत. या रस्त्यांवर अतिक्रमण झाले आहे. बेशिस्तपणे वाहने लावली जातात. दुकाने व हॉटेलमध्ये आलेले ग्राहक रस्त्यांवरच वाहने लावतात. विक्रेते व दुकानदारांनी आपला माल व साहित्य पदपथावर मांडतात. शहरातील मुख्य रस्त्यावर लोखंडी कठड्यावर थेट विनापरवाना फ्लेक्स लावण्यात येतात. त्यामुळे सदर रस्ते हे अरुंद झाले आहेत. या रस्त्यावर सकाळी व सायंकाळच्या वेळेत प्रचंड वाहतूक वर्दळ असते.

शहरात पदपथ व रस्त्यांवरील अतिक्रमण आणि बेशिस्त वाहन पार्किंमुळे वाहतूक संथ होऊन वारंवार कोंडी होत आहे. याच प्रकारामुळे गेल्या आठवड्यात बुधवारी शहरातील बसस्थानका समोर वेगातील कार चालकाने दुचाकीला धडक दिली त्यामध्ये एका महिला व सात वर्षांच्या बालकास दुखापत झाली. यात बेशिस्त पार्किंगही जबाबदार असल्याचे आढळून आले. या प्रकाराचे अपघात या नवीन बसस्थानक परिसरात नेहमी होत आहेत. असे असतानाही नगरपालिका प्रशासन व वाहतूक पोलिसांकडून नियमितपणे कठोर कारवाई होत नसल्याने निव्वळ बघ्याची भूमिका घेतली जात असल्याने नागरिक संताप व्यक्त करीत आहेत. यासंदर्भात स्वराज्य युवा एकता फाउंडेशन आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या माध्यमातून पोलीस उपविभागीय अधिकारी मयंक माधव तसेच पोलीस निरीक्षक संजय गायकवाड यांना निवेदन देऊन शहरातील वाहतूक कोंडी व मुख्य रस्त्यावर अतिक्रमण काढण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

# महिला बचत गटातर्फे सावित्रीबाई फुलेंना अभिवादन

■ सामूहिक सक्षमीकरणातून महिला मुक्ती दिन साजरा
■ मुलींचे हक्क जागरूक करून बालिका दिन साजरा



युवाराष्ट्र दर्शन / भंडारा

**साकोली :** स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, समाजसुधारक आणि कवयित्री क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंती निमित्त, ३ जाने. रोजी महिला बचत गट शंकरपुर/वडेगांव येथील महिलांनी, बौद्ध विहार परिसरात सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन केले व मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.

सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त महिला मुक्ती दिनाचे औचित्य साधून स्त्रियांनी सामूहिक सक्षमीकरणातून आपले हक्क, न्याय, समानता व सामाजिक व आर्थिक समता सक्षम करण्यासाठी चर्चा करून जनजागृती केली. तर बालिका दिनानिमित्त मुलींना एकत्रित गोळा करून त्यांना त्यांचे हक्क, शिक्षण व आरोग्याचे महत्व समजावून सांगितले व मार्गदर्शन केले व अशा प्रकारे बालिका दिन साजरा करण्यात आला.

प्रसंगी नवरत्न महिला बचत गटातील सर्व महिला पदाधिकारी व इतरत्र गटातील महिला अध्यक्षा, उपाध्यक्षा, सचिव व खनिजदार त्याचप्रमाणे गावातील लहान मुली देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त जनजागृती उपक्रम राबविल्याने महिलांचे सक्षमीकरण अजून दृढ होईल अशी आशा व्यक्त केली जात आहे तर जनतेकडून महिलांचे सर्वत्रचं कौतुक केले जात आहे.

# बन्सीलाल लाहोटी नूतन महाराष्ट्र विद्यालयात क्रीडा महोत्सव साजरा

युवाराष्ट्र दर्शन / भंडारा

**भंडारा :** स्थानिक बन्सीलाल लाहोटी नूतन महाराष्ट्र विद्यालयात दिनांक १ जाने.२०२६ रोज गुरुवारला सकाळी ९ वाजता क्रीडा महोत्सव सप्ताह साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश सिंग प्राचार्य निर्धन राव वाघाये पाटील सानगडी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आशिष खेडीकर आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून आकाश गायकवाड तालुका क्रीडा ऑफिसर भंडारा हे मंचावर उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी अध्यक्ष मुकुंदराव वझलवार प्रमुख अतिथी म्हणून किशोर प्रधान , जयंता प्रधान , तसेच शाळेचे माजी वरिष्ठ लिपिक चैतन्य उमाळकर शाळेचे मुख्याध्यापक तरोणे सर, स्नेहसंमेलन प्रमुख सौ एस. एस .बुधे मॅडम, शाळा नायक मनीष वाडीभस्मे, शाळा नायिका कुमारी मैत्री कामठे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती.



शाळेच्या प्रवेशद्वारात पाहुण्यांचे आगमन होताच औक्षण करून त्यांना सन्मानपुर्वक मंचावर नेण्यात आले. यानंतर मंचावर उपस्थित पाहुण्यांचे स्वागत शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी क्रीडा महोत्सवाचे भव्य मशाल पेटवून उद्घाटन केले.

पाहुण्यांच्या आगमना प्रित्यर्थ शालेय विद्यार्थिनींनी स्वागत गीत गाईले. यानंतर मंचावर उपस्थित मान्यवरांसमोर गणपती नृत्य, तसेच कराटेचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. नृत्याचे सादरीकरण अतिशय उत्तम रित्या करण्यात आले होते. शाळेतील क्रीडा शिक्षक प्रशांत घाटबांधे सर यांचे मार्गदर्शन शाळेतील खेळाडूंना मिळत असते. तसेच आजचा हा क्रीडा महोत्सव प्रशांत घाटबांधे सरांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आलेला होता. विद्यार्थ्यांना भविष्यात खेळाबद्दलची आवडनिर्माण व्हावी. तसेच त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास व्हावा या उद्देशाने क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाश सिंग यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रात्यक्षिक पाहून त्यांची प्रशंशा केली. विद्यार्थ्यांनी फक्त अभ्यास केंद्री न बनता खेळामध्ये सुद्धा आपले करिअर बनवले पाहिजे यावर भर दिला. भविष्यात या शाळेतून अतिशय उत्तम खेळाडू तयार होतील अशा आशावाद त्यांनी सर्वांसमोर व्यक्त केला. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे बॅडमिंटन पटू आशिष खेडीकर यांनी आजच्या विद्यार्थी हा एक उत्तम खेळाडू होऊ शकतो फक्त त्याने आपले ध्येय निश्चित केले पाहिजेत. व ध्येय प्राप्तीसाठी उत्तम सराव केला पाहिजेत असे मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेतील क्रीडा शिक्षक प्रशांत घाटबांधे यानी केले.

## प्रा.आ.केंद्र खांबा येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

युवाराष्ट्र दर्शन / भंडारा

**साकोली :** स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, समाजसुधारक आणि कवयित्री क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंती निमित्त, ३ जाने. रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र खांबा येथील कर्मचारी व मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले व जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



दरम्यान डॉ. पवन फुंडे यांनी महिलांना महिला मुक्ती दिन व बालिका दिनाचे महत्व सांगून सक्षम होण्यास सांगितले तर आपल्या लहान बाळांच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी असे आवाहन केले. प्रसंगी डॉ. पवन फुंडे, भेंडारकर, सचिन रिनाईत, निलेश मेश्राम, निखिल कठाणे, श्रीकांत पुसाम, गुरूदास डोंगरवार व महिला ज्योती जांभुळकर, सीमा राणे व इतर महिला उपस्थित होते.

# लाखनी येथे ११ जानेवारीला शासकीय योजनांचा महामेळावा

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व प्रशासनाचा उपक्रम

युवाराष्ट्र दर्शन / भंडारा

**भंडारा :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने ११ जानेवारी २०२६ रोजी लाखनी येथे नागरिकांसाठी शासकीय सेवा व योजनाचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. या महामेळाव्याचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा भंडारा जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती महेंद्र चांदवाणी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी सावन कुमार, पोलीस अधीक्षक नुरुल हसन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलींदकुमार साळवे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. शासकीय सेवा व योजनांच्या महामेळाव्यास नागरिकांनी उपस्थित राहून शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष राजेश अस्मर यांनी केले आहे.



जिल्हा न्यायलय येथे आयोजित महामेळावासंदर्भात आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी लिना ढेंगे-फलके व प्राधिकरणाचे सचिव तथा वरिष्ठ न्यायाधीश मिलिंदकुमार बुराडे व इतर न्यायाधीश तसेच विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांनी दिलेल्या निदेर्शानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेश अस्मर यांच्या अध्यक्षतेखाली हा महामेळावा होणार असून महामेळाव्याचे उद्घाटन ११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता होईल. महामेळावा सकाळी १०.३० ते दुपारी ४ या कालावधीत होणार आहे.

महामेळाव्यात शासनाचे विविध विभाग व कार्यालये सहभागी होतील. ते जनतेस विविध शासकीय योजनांचा माहिती देतानाच या योजनांचा लाभही देतील. या महामेळाव्यात जिल्हाधिकारी कार्यालय, आदिवासी विकास विभाग, कामगार विभाग, महसूल, समाजकल्याण, भूमी अभिलेख, वीज वितरण कंपनी, आरोग्य, शिक्षण, जिल्हा माहिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम विभाग, मोफत विधी सहाय्यसल्ला, सायबर क्राइम, व शासनाचे इतर सहभागी होणार आहेत.

# खमारी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

युवाराष्ट्र दर्शन / भंडारा

**भंडारा:-** कारधा केंद्रातंर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या अंगणवाडी केंद्र १ व २ यांच्या संयुक्त विद्यमानाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खमारी बुटी च्या आवारात मोठ्या उत्साह नुकतीच साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती सदस्य किशोर ठवकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते विलास केजरकर, खमारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. गिता मोटघरे, अंगणवाडी सेविका चंदा मडामे, ज्योती रेहपाडे व शिक्षक -शिक्षिका, विद्यार्थिनी - विद्यार्थी उपस्थित उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. उपस्थित मान्यवर महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जिवन चारित्र्यावर मार्गदर्शन करतांना म्हणाले की, सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. त्या काळातील रूढी, अंधश्रद्धा आणि विरोध असूनही त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू केल्या, विधवा -पुनर्विवाहाला पाठिंबा दिला आणि अस्पृश्यतेविरोधात आवाज उठवला. त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक पाऊल हे धाडसाचे आणि समाजहिताचे होते. भारताच्या सामाजिक इतिहासात शिक्षण, समानता आणि स्त्री-मुक्तीच्या चळवळीला दिशा देणाऱ्या सावित्रीबाई फुलेंच्या कायार्तून मिळालेले मूल्य व विचारांचा स्वीकार करून कृतीत उतरवणे हींच खरी आदरांजली ठरेल अशी प्रतिक्रिया मान्यवरांनी व्यक्त केली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गभणे यांनी केले तर उपस्थितांचे आभार अंगणवाडी सेविका चंदा मडामे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सुनिता भांबोरे, केशव लेदे, कांचन खोब्रागडे, अमृता करनायके, अंगणवाडी मदतनीस नंदा सार्वे, यामिनी अहिरकर, अस्मिता तांडेकर, पंचफुला मोहतुरे, स्वरा मारवाडे, प्रथमेश मेश्राम, श्रेष्ठ समरित, प्रज्ञा मेश्राम व शिक्षक -शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहकार्य केले.

# भोजापुर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती सोहळा संपन्न

युवाराष्ट्र दर्शन / भंडारा

**भंडारा :-** सावित्रीमाईंचा जन्म दिवस संपूर्ण भारतात बालीका दिन व महिला मुक्तीदिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. कारण भारतात सामाजिक सुधारणा, सामाजिक परिवर्तन चळवळीतील एक अग्रगन्य व्यक्ती म्हणून सावित्रीमाई ओळखल्या जातात. जाती आणि लिंगावर आधारीत भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहिसी करण्यासाठी त्यांनी अहोरात्र मरेपर्यंत कार्य केले. त्या एक थोर शिक्षणतज्ञ आणि विपुल लेखन करणाऱ्या कवयित्री होत्या. म्हणूनच सावित्रीमाईला भारतीय स्त्रीवादाची जननी मानल्या जाते. राष्ट्रपिता ज्योतीराव हे भारतातील स्त्री शिक्षणाचे तसेच शुद्रातीशुद्राच्या शिक्षणाचे आद्यप्रणेते आहेत. तर सावित्रीमाई ह्या भारतातील मुलींच्या ब्रिटश कालीन प्रथम शिक्षिका होत्या. त्या इंग्लिश शिक्षणाच्या पुरस्कर्त्या होत्या. सावित्रीमाईनी आरंभ केलेल्या स्त्री शिक्षणामुळे आज स्त्रियांनी तसेच बहुजन (SC,ST, OBC) समाजाने प्रत्येक क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केलेली आहे. म्हणूनच त्यांच्या क्रांतीकायो८' व विचाराला अभिवादन करण्यासाठी व त्यांचे कार्य अविरत सुरु ठेवण्यासाठी महिलांनी त्यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवावे असे प्रतिपादन भंडारा जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी मनिषा गजभिये यांनी केले.



त्या संयुक्त जयंती सोहळा समिती, महात्मा ज्योतिबा फुले कॉलनी, सिद्धार्थ नगर व न्यु महात्मा फुले कॉलनी भोजापूर (भंडारा) यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त महात्मा फुले कॉलनी च्या पटांगण नागपूर रोड भोजापूर येथे मार्गदर्शन करतांना बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संयुक्त जयंती सोहळा समितीच्या कार्याध्यक्ष पुष्पाताई रामटेके होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बेला येथील सरपंच शारदा गायधने, जिल्हा परिषद भंडारा येथील माध्यमिक शिक्षणाधिकारी मनिषा गजभिये, महिला व बाल समुपदेशक सुषमा बन्सोड, ग्राम पंचायत सदस्य पल्लवी अश्विन पाटील, मौदा येथील जनता प्राथमिक शाळेच्या शिक्षिका ममता जांभुळे, दुर्गा चटप, भारतीय आट्यापाट्या संघाची कर्णधार तथा सुवर्णपदक पदक विजेती कु. प्राची केशव चटप, धनराज लुटे, पोलीस पाटील प्रिती मानापुरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त भारतीय आट्यापाट्या संघाची कर्णधार तथा सुवर्णपदक पदक विजेती कु. प्राची केशव चटप व उर्वी हिच्या हिने केक कापून जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

त्यावेळी क्रीडा क्षेत्रात भारताचे नाव लौकिक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय खेळाडू व सुवर्णपदक विजेती कु. प्राची केशव चटप व इंटरनॅशनल एशियन चैम्पियनशिप सायकलींग सुवर्ण पदक विजेती कु. मयुरी लुटे चे वडील धनराज लुटे हिचा सत्कार करण्यात आला तसेच लीपक्षी नागदेवे, प्रवज्या सुखदेवे इत्यादी विद्यार्थिनींनी उत्कृष्ट भाषण दिले. अनुष्का कांबळे, रिधम सोनुने यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

यावेळी परिसरातील महिला मंडळी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री मेश्राम, शालू बांबोर्डे व प्रास्ताविक किरण डोहणे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार पल्लवी पाटील यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयुक्त जयंती सोहळा समितीच्या अध्यक्षा हेमा नागदेवे, कोषाध्यक्ष स्मिता सतदेवे, जोत्स्ना हुमणे, नितीशा बन्सोड, जसबीर ललत, प्रज्ञा सांगोडे, किरण ताजने, सीमा कांबळे. रागिनी उके, मंगला गोस्वामी, संघमित्रा घापर्डे, नीलिमा मेश्राम, प्रिया रामटेके, रंजना लेंडे, अस्विनी रामटेके व संयुक्त जयंती सोहळा समिती, महात्मा ज्योतिबा फुले कॉलनी, सिद्धार्थ नगर आणि न्यु महात्मा फुले कॉलनी भोजापूर (भंडारा) च्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

युवाराष्ट्र दर्शन
# गडचिरोली जिल्हा
सोमवार, दि.५ जानेवारी २०२६



## विज्ञान प्रदर्शनात चंदेल महाविद्यालय अव्वल

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**
**कुरखेडा दि.४ :** दि.२९ ते ३० डिसेंबरपर्यन्त शासकीय आश्रमशाळा येंगलखेडा आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये सौ. जे. बि. चंदेल कला कनिष्ठ महा. खरमतटोला यांनी दिव्यांग गटातून प्रथम क्रमांक पटकविलेला आहे.

मार्गदर्शक शिक्षिका प्राचार्य उमा चंदेल यांच्या मार्गदर्शनाखाली १२ व्या वर्गातील ज्ञानेश्वरी नैताम आणि स्नेहा लोणारे यांनी प्रतिकृति सादर केली होती. दरवर्षी प्रमाणे याही शैक्षणिक सत्रात विद्यार्थिनी अव्वल स्थान प्राप्त केल्याने सर्वच स्तरावरून विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षिका यांचे कौतुक तथा अभिनंदन केले जात आहे.

सदर प्राविण्याबद्दल आदिवासी शिक्षण प्रसारक मंडळ कुरखेडाचे सचिव जयेंद्रसिंह चंदेल, संस्थेच्या अध्यक्षा जानकीबाई चंदेल महविद्यालयांचे प्राचार्या उमा चंदेल यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक तथा अभिनंदन केले असून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिले आहेत. या यशासाठी जे. बि. चंदेल महाविद्यालयातील सर्व कर्मचारी यांनी विद्यार्थी मार्गदर्शक शिक्षिका यांनी अभिनंदन केले.

# अहेरी पोलिसांनी पकडला २.७१ लाखांचा हुक्का तंबाखू

### कारसह ६.७१ लाखांचा मुद्देमाल जप्त



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**
**अहेरी दि.४ :** जिल्हा पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (SDPO) यांच्या मार्गदर्शनाखाली अहेरी पोलिसांनी अंमली पदार्थांविरुद्ध मोठी कारवाई केली आहे. गेर्या फाटा परिसरात कारमधून अवैधरित्या वाहतूक केला जाणारा २ लाख ७१ हजार २०० रुपये किमती. चा सुगंधी हुक्का तंबाखू जप्त करण्यात आला असून, या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, अहेरी पोलिसांनी गेर्या फाट्यापासून ३ किमी पश्चिमेला नाकाबंदी करून एका मारुती सुझुकी सेलेरिओ कारची (क्र. एमएच-३३, एसी-२०२४) झडती घेतली. यावेळी कारमध्ये पांढऱ्या रंगाच्या ६ चुंबड्यांमध्ये लपवून ठेवलेले 'मजा १०८ हुक्का फ्लेवर' तंबाखूचे एकूण २४० डबे आढळून आले.

जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये हुक्का तंबाखू - २४० डबे (प्रति डब्बा ११३० रुपये असुन एकूण किंमत २,७१,२२,०० रुपये, वाहन मारुती सुझुकी सेलेरिओ कार - अंदाजे किंमत ४,००,००० रुपये असुन एकूण मुद्देमाल ६,७१,२०० रुपये आहे.

आरोपींची नावे १) सोहेल शिराज खान पठाण (२१), रा. आलापल्ली २) इसरार हुसेन शेख (३७), रा.बाजारवाडी, आलापल्ली गुन्हा दाखल व तपासया प्रकरणी पोलीस नाईक मंगेश शामराव सोनवणे यांच्या फिर्यादीवरून आरोपींविरुद्ध अहेरी पोलीस ठाण्यात BNS - २०२३ च्या कलम १२३, २७४, २७७, २७८, ३(५) अन्वये गुन्हा (अप. क्र. ००९/२०२६) दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई अहेरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक हर्षल ऐकरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चौतन्य घावटे करीत आहेत.

## कामगारांच्या हक्कासाठी ८ ला जि.प.वर मोर्चा

### मोर्चात सहभागी होण्याचे अरविंद कात्रटवार मित्रपरिवाराचे आवाहन

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.४ :** शासनाच्या वतीने बांधकाम व इतर कामरागांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. कामगार म्हणून योजनांचा लाभ घेण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसेवकांकडून प्रमाणपत्र अनिवार्य आहे. त्याअनुषंगाने १३ ऑगस्ट २०२४ रोजी राज्य शासनाने राजपत्र सुध्दा काढले आहे. परंतु, मौशीखांब मुरमाडी जिल्हा परिषद क्षेत्रातील ग्रामसेवकांकडून कामगारांना प्रमाणत्र देण्यास नकार देण्यात येत आहे. परिणामी हजारो कामगार योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. ग्रामसेवकांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते अरविंद कात्रटवार यांच्या नेतृत्वात ८ जानेवारी रोजी जिल्हा परिषदेवर कामगारांचा धडक मोर्चा काढण्यात येणार आहे.

अरविंद कात्रटवार यांनी स्पष्ट केले आहे की, सामाजिक सुरक्षा, कामगारांच्या पाल्यांसाठी शैक्षणिक योजना, कामगारांसाठी आरोग्य विषय सुविधा आणि आर्थिक पाठबळ देणाऱ्या योजनांचा समावेश आहे. कामगार योजनांचा लाभासाठी दस्तावेजाची जुळवाजुळव करून कामगार कार्यालयाच्या समोर रांगा लावत आहेत. मात्र मौशीखांब-मुरमाडी जिल्हा परिषद क्षेत्रातील हजारो कामगारांवर ग्रामसेवकांच्या असहकार्यामुळे कामगार विभाग योजनांच्या लाभापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे.

कामगार हे मोलमजूरी करून कुटुंबांचा गाडा हाकत आहेत. बांधकाम कामगारांना कामगार विभागाच्या योजनेपासून वंचित राहण्याची पाळी आली आहे. या गंभीर बाबीकडे तत्काळ लक्ष देऊन ग्रामपंचायत स्तरावरून कामगारांना प्रमाणपत्र देण्याचे ग्रामसेवकांना सक्त निर्देश द्यावेत, आणि प्रमाणपत्र देण्यास नकार देणाऱ्या ग्रामसेवकांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी ८ जानेवारी रोजी जिल्हा परिषदेवर कामगारांचा धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चात कामगारांनी सहभागी होण्याचे आवाहन अरविंद कात्रटवार, यादव लोहंबरे, गोपाल मोंगरकर, यादव चौधरी, विनोद चापले, प्रशांत ठाकूर व मित्रपरिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्र.कुलगुरू डॉ.श्रीराम कावळे यांची महासार्कच्या सदस्यपदी निवड



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.४ :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये सहकार्य, समन्वय आणि नवोपक्रमाची संस्कृती निर्माण करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद (महासार्क) या महत्त्वपूर्ण समितीवर गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.श्रीराम कावळे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.

महासार्क समितीतील काही पदे रिक्त असल्याने राज्य शासनाने अध्यादेश प्रसिद्ध करून राज्यातील दोन प्र-कुलगुरूंची या समितीवर नियुक्ती जाहीर केली असून, त्यामध्ये डॉ. कावळे यांचा समावेश करण्यात आला आहे. ही नियुक्ती गोंडवाना विद्यापीठासाठी तसेच विदर्भातील उच्च शिक्षण क्षेत्रासाठी अत्यंत अभिमानास्पद मानली जात आहे.

या नियुक्तीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, कुलसचिव डॉ.अनिल हिरेखण, व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य, शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ, अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, विविध स्तरांतून डॉ.श्रीराम कावळे यांचे अभिनंदन केले जात आहे.

## यशोदरा विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि.४ :** येथील यशोधरा विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, निशिगंधा इंग्लिश स्कूल, बा.म.सहारे उच्च प्राथमिक शाळा, राहुल मुलांचे वसतिगृह यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी सुप्रसिद्ध गायिका गौरी शिंदे यांचा सदाबहार गीतांचा कार्यक्रम पार पडला. प्रसंगाचे औचित्य साधून सत्कारमूर्ती प्रल्हाद दुबे, विजय कोमेवार, मधुकर बोधलकर, बबनराव वडेट्टीवार, राजेश ठाकूर व किशोर ओल्लालवार यांचा सत्कार करण्यात आला. सोबतच सेवानिवृत मुख्याध्यापिका माया तायवाडे, सेवानिवृत्त कनिष्ठ लिपीक यु.बी. वाळके, सेवानिवृत्त शिपाई रुपलता शेंडे व राम गुंटुकवार तसेच संतोष नैताम यांचे आईवडील लक्ष्मण नैताम यांचा राहुल लोकविकास मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

मंचावर मंडळाच्या अध्यक्षा कौशल्या सहारे, सचिव विवेक सहारे, कोषाध्यक्ष वकटु उंदिरवाडे, माणिक साखरे, रेखा साखरे, विशेष अतिथी सेवानिवृत न्यायाधिश अशोक भैसारे, कुंदा भैसारे, प्राचार्य शाम रामटेके, प्राचार्या संचालिका वालदे, मुख्याध्यापिका सुजाता रामटेके, अधीक्षक रेवनदास उंदिरवाडे उपस्थित होते.

दुसऱ्या दिवशी निशिगंधा इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मनोरंजना सोबतच राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारे विविध कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली. तिसऱ्या दिवशी यशोधरा विद्यालय व बा.म.शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी पुन्हा रंगत आणली.

## विज्ञान हा मानवी प्रगतीचा आधारस्तंभ: गजबे




**विशेष प्रतिनिधी**
**देसाईगंज दि.४ :** विज्ञान हा मानवी प्रगतीचा आधारस्तंभ आहे. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी विज्ञान प्रदर्शने महत्त्वपूर्ण भूमिका बजावितात, असे प्रतिपादन माजी आमदार कृष्णा गजबे यांनी केले.

देसाईगंज पंचायत समितीअंतर्गत तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन आदर्श इंग्लिश हायस्कूलात २९ ते ३१ डिसेंबरदरम्यान करण्यात आले. या प्रदर्शनाच्या समारोप बक्षीस वितरणाने करण्यात आला. याप्रसंगी ते मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्ष लता सुंदरकर, नूतन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जगदीश शर्मा, सचिव मोतीलाल कुकरेजा, मार्गदर्शक प्रा.डॉ.श्रीराम गहाणे, नीलकंठ पोपटे, योगेश नाकतोडे, यशवंत टेंभुर्णे, एकनाथ पिल्लारे, आनंद गुरनुले, ज्ञानेश्वर बांडे, अंबादास आमनेर, मुरलीधर सुंदरकर, नाकाडे, उईके, केळझरकर आदी उपस्थित होते.

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये माध्यमिक गटातून महात्मा गांधी विद्यालय प्रथम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय द्वितीय तर आदर्श इंग्लिश हायस्कूल वडसाने तृतीय क्रमाक पटकाविला. प्राथमिक गटामध्ये जि.प.शाळा कुरुड प्रथम, जिल्हा परिषद शाळा कोंढाळा द्वितीय तर महात्मा गांधी विद्यालय वडसाने तृतीय क्रमांक पटकाविला. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला तालुक्यातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विषय साधनव्यक्ती तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या हक्कासाठी कटिबध्द - आ.नरोटे



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.४ :** शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्र शेतकऱ्यांसाठी आधार ठरत आली आहे. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी व योग्य मोबदला मिळावा यासाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आ. डॉ.मिलिंद नरोटे यांनी केले.

तालुक्यातील वडेगाव (कुरूंडीमाल) येथे आदिवासी विविध सहकार्यकारी सेवा सदस्य संस्थेच्या वतीने धान खरेदी केंद्राच्या उद्‌घाटनाप्रसंगी ते उद्‌घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजप जिल्हाध्यक्ष रमेश बारसागडे होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार डॉ. नामदेव उसेंडी, माजी आमदार कृष्णा गजबे, भाजप लोकसभा प्रमुख तथा माजी भाजप जिल्हाध्यक्ष किसन नागदेवे, भाजप महामंत्री गोवंद सारडा, आदिवासी आघाडी जिल्हाध्यक्ष नितीन कोडवते, जिल्हा महामंत्री सदानंद कुथे, चंदा कोडवते, गोपाल उईके, केशव मडावी, नगरसेवक नरेश विठ्ठलानी, प्रदीप बोडणे, वासूदेव मडकाम आदी उपस्थित होते.

परिसरातील शेतकऱ्यांमध्ये मागील अनेक दिवसांपासून आधारभूत धान खरेदी केंद्र सुरू करण्याची होत होती. अखेर प्रशासनाने तत्परता दाखवित या खरेदी केंद्रातून धान खरेदीस सुरुवात केल्याने कुरंडीमाल, कुरुडींचक, डोंगरतमाशी, मेंढा, वडेगाव, छोटेबोडी, उमरी, येंगाडा, परसवाडी, कोरेगाव, विहिरगाव या गावातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

याप्रसंगी खरेदी केंद्राचे संचालक, सदस्य तसेच बहूसंख्य शेतकरी उपस्थित होते.

## स्नेहसंमेलनातून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव : योगिता पिपरे

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.४ :** स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण व व्यक्तिमत्त्व विकास कसा घडतो, ग्रामीण भागातील विद्यार्थीही कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत, फक्त संधी आणि मार्गदर्शन मिळाले पाहिजे, अशा स्नेहसंमेलनातून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या गुणविकासाला वाव मिळतो, असे प्रतिपादन नगरसेविका योगिता पिपरे यांनी केले.

दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था संचालित विद्या भारती हायस्कूल, गोगाव येथे गुरूवार १ जानेवारी रोजी शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळ्याचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका प्रतिभा रामटेके होत्या. उद्‌घाटक म्हणून संस्थेचे सदस्य तथा शा.स.वी.हा. गोगावचे अध्यक्ष डॉ. सुरेश रामभाऊ रडके, शिक्षण विस्तार अधिकारी संगीता खोब्रागडे, प्रमुख अतिथी म्हणून महादवाडीचे सरपंच प्रशांत खोब्रागडे, मुखरू चुधरी, पेवानंद चुधरी, पोलिस पाटील उत्तम मूनघाटे उपस्थित होते.

स्नेहसंमेलनात पाककला स्पर्धा, पुष्परचना, हस्तकला स्पर्धा, प्रश्नमंजुषा, गीतगायन, तसेच विज्ञान व गणितीय प्रतिकृतींच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या कर्मचाऱ्यांनी नगरसेविका योगिता पिपरे यांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सन्मान केला व त्यांच्या उपस्थितीबद्दल मन:पूर्वक आभार मानले.

## चांभार्डा परिसरात अस्वलाची दहशत



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.४ :** गडचिरोली तालुक्यातील चांभार्डा परिसरात मागील काही दिवसांपासून अस्वलाची चांगलीच दहशत पसरली आहे. सोमवारी दि.२९ डिसेंबरच्या रात्रीच्या सुमारास चांभार्डा गावालगतच्या गुरुदेव मंदिराजवळ काही ग्रामस्थांना अस्वल निदर्शनास आले. यानंतर ग्रामस्थांनी फटाके फोडले, या आवाजामुळे अस्वल नंतर पाल नाल्याच्या दिशेने पळाले. सध्या शेतातील धान काढणी झाली असून बांध्या मोकळ्या आहेत. त्यामुळे वन्यप्राण्यांचा मुक्त संचार सुरू झाला आहे.

दरम्यान मागील काही दिवसांपासून या भागात अस्वलाचे दर्शन घडून येत असल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## नगराध्यक्ष निंबोरकर यांच्या हस्ते व्यसनमुक्ती व उपचार केंद्राचे उद्घाटन



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.४ :** समाजातील वाढत्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी महत्त्वाचे पाऊल असलेल्या नवजीवन व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्राचे उद्‌घाटन नवनिर्वाचित नगराध्यक्ष ॲड.प्रणोती सागर निंबोरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

गडचिरोली येथे व्यसनमुक्तीच्या आधुनिक उपचार पद्धतींच्या माध्यमातून सेवा देणाऱ्या केंद्राचे उद्‌घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. हे केंद्र मानवमित्र बहुउद्देशीय संस्था, चंद्रपूर यांच्या वतीने संचालित करण्यात येणार आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना नगराध्यक्ष ॲड.प्रणोती निंबोरकर म्हणाल्या की, व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी उपचारासोबत समुपदेशन, पुनर्वसन आणि सकारात्मक दृष्टीकोन आवश्यक असून नवजीवन केंद्र ही या दिशेने एक आशादायी सुरुवात आहे. याप्रसंगी आमदार डॉ. मिलिंद नरोटे, नगरसेवक निखिल चरडे, अनिल पोहनकर, प्रशांत वरगंटीवार, रवी मसराम, सागर सोनटक्के यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व मान्यवरांनी या केंद्राच्या उपक्रमाचे कौतुक करत समाजोपयोगी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# जिल्हयात विविध ठिकाणी बालिका दिन साजरा





**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.४ :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हयात विविध शाळामध्ये तसेच शासकीय-निमशासकीय कार्यालयात, महाविद्यालयात बालिका दिवस साजरा करण्यात आला.

**शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली :** स्थानिक शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली येथे ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती सांस्कृतिक विभाग व रासेयो यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.नंदाजी आर.सातपुते होते. या कार्यक्रमा अंतर्गत सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले याच्या प्रतिमेला माल्यार्पण व दिप प्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकतेतून रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.के. आर. भांडारकर यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनी तसेच कार्यावर थोडक्यात प्रकाश टाकला. प्राचार्य डॉ.नंदाजी सातपुते म्हणाले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची संघर्ष यात्रा संपूर्ण जगाला प्रकाशमान करणारी आहे. आज जे मुलींना सर्व क्षेत्रात समान संधी आणि शिक्षण मिळत आहे, त्याचे संपूर्ण श्रेय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना जाते. आपला सर्वांगीण विकास साधण्यासाठी अश्या थोर महापुरुशांचे जीवन चरित्र वाचायला पाहिजे, असे उपस्थित सर्वांना आव्हाहन केले.

**दीक्षाभूमी देसाईगंज :** भारतात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त सम्यक जागृत बौद्ध महिला समिती दीक्षाभूमी देसाईगंज तर्फे अभिवादन करण्यात आले.

यावेळी महिलांकरिता डॉ. सोनल आत्राम व त्यांच्या टीमने रक्त, शुगर बीपी तपासणी कॅम्प लावून आपले योगदान दिले. प्रमुख पाहुणे कल्पना कापसे यांनी महीलांनी घराबाहेर पडून आपल्यामध्ये असलेल्या गुणांचा विकास केला पाहिजे असे आवाहन केले तर डॉ.वंदना घोंगडे यांनी १ जानेवारी शोर्य दिवस याबद्दलची माहिती दिली.

यावेळी नूगाबेस्टच्या संचालिका शितल आत्राम यांनी ॲक्यूप्रेशरचे फायदे सांगून नूगाबेस्ट सेंटर वडसा भेट देण्यासाठी आवाहन केले. अध्यक्षिय भाषणात समितीच्या अध्यक्षा ममता जांभूळकर यांनी स्त्रियांना कुटुंबाचा पाठिंबा मिळाला तर त्या सर्वच क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात असे म्हटले. यावेळी क्रांतिज्योती वर आधारित गीताची स्पर्धा घेण्यात आली. त्यात प्रथम सोनाली चांदेवार, द्वितीय कल्पना गुळदे तृतीय पदमा सहारे तर प्रोत्साहन किरण नगरकर व पुजा देशकर यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले तसेच क्रांतिज्योती ला रांगोळीतून साकारणाऱ्या मोना अटाळकर यांनाही गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरीता बारसागडे, संचालन जयश्री लांजेवार तर आभार प्रतिमा शेंडे यांनी केले. उद्‌घाटन रत्नमाला बडोले व विद्या लोखंडे यांनी केले.

## दोन लाखापर्यंतच्या पीक कर्जावरील मुद्रांक शुल्य माफ

### शेतकऱ्यांनी सवलतीचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी पंडा यांचे आवाहन



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.४ :** महाराष्ट्र शासनाने नवीन वर्षाच्या मुहूर्तावर राज्यातील शेतकऱ्यांसाठी एक मोठा दिलासादायक निर्णय जाहीर केला आहे. महसूल व वन विभागाने १ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या विशेष राजपत्रातील आदेशानुसार, शेतकऱ्यांनी घेतलेल्या २ लाख रुपयांपर्यंतच्या शेती किंवा पीक कर्जाशी संबंधित सर्व कायदेशीर कागदपत्रांवरील मुद्रांक शुल्क आता पूर्णत: माफ करण्यात आले आहे. हा निर्णय १ जानेवारी २०२६ पासूनच लागू झाला आहे.

या निर्णयामुळे शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी लागणारे विविध करारनामे, हक्कविलेख निक्षेप, तारण गहाणखत, हमी पत्र, गहाणाचे सूचनापत्र किंवा घोषणापत्र यांसारख्या कोणत्याही संलेखावर आता मुद्रांक शुल्क भरावा लागणार नाही. या सवलतीचा लाभ प्रामुख्याने पीक कर्ज घेणाऱ्या अल्पभूधारक व गरजू शेतकऱ्यांना होणार असून, कर्ज प्रक्रियेत येणारा अतिरिक्त आर्थिक खर्च यामुळे वाचणार आहे.

जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना या सवलतीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी केले आहे. शासनाचा हा निर्णय कृषी क्षेत्राला बळकटी देणारा असून शेतकऱ्यांनी आपल्या पीक कर्ज प्रकरणांसाठी या योजनेचा फायदा घ्यावा, असे त्यांनी नमूद केले आहे.

# उमरेड बसस्थानकावर अवैध विक्रेत्यांचा सुळसुळाट

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**उमरेड , दि. ४**

राज्य परिवहन महामंडळातर्फे बसस्थानकावर प्रवाशांना सर्व सुविधा मिळाव्यात यासाठी राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक प्रयत्नशील आहेत. मात्र, नागपूर विभागातील उमरेड बसस्थानकावर अवैध विक्रेत्यांनी थैमान मांडल्याने प्रवासी त्रस्त झाले आहेत. यासंदर्भात एसटी अधिकाऱ्यांकडे अनेकदा तक्रारी करूनही काहीच फायदा झाला असून एसटी विभागाच्या एका अधिकाऱ्याचा या विक्रेत्यांना अभय असल्याचा प्रकार समोर आला आहे.

उमरेड बसस्थानक येथे मागील अनेक दिवसांपासून खाद्यपदार्थ आणि इतर वस्तू विकणाऱ्या अवैध विक्रेत्यांची संख्या वाढली आहे. बसस्थानकात मंजूर विक्रेत्याच्या मदतीने अवैध विक्रेते थेट बसमध्ये शिरून खाद्यपदार्थाची विक्री करीत आहेत. त्यामुळे बसमधील प्रवाशांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. हे विक्रेते बसमधील प्रवाशांना धक्कामुक्की करीत जोरजोरात ओरडून आपल्या मालाची विक्री करतात. प्रवाशांनी तक्रारी केल्यानंतर काही अधिकाऱ्यांनी कारवाईचा बडगा उभारला असता एका वरिष्ठ अधिकाऱ्याने हस्तक्षेप करून कारवाई थांबविल्याची माहिती आहे.

## या विक्रेत्यांना कुणाचा आशीर्वाद



बसमध्ये शिरून खाद्यपदार्थांची विक्री करताना अवैध विक्रेता

या बसस्थानकावर अवधेश तरार हा अधिकृत विक्रेता आहे. तरीही आणखी काही विक्रेते बसस्थानक आणि बसमध्ये शिरून आपल्या मालाची विक्री करतात. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. प्रशासकीय कामकाजा पारदर्शकता नसल्याचा आरोप होत आहे. विभाग नियंत्रकाची कारकिर्द सुरूवातीपासूनच वादग्रस्त राहिली आहे. अनेक प्रकरणात त्यांची विभागीय चौकशी सुरू आहे. या कारणामुळे त्यांचे प्रशासकीय आणि आर्थिक अधिकार वरिष्ठांनी गोठवि आहेत. त्यांचाच या अवैध विक्रेत्यांना आशीवार्द असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. अवैध विक्रेत्यांना पाठिशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून अवैध विक्रेत्यांचा कायमचा बंदोबस्त करावा अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

# शालार्थ घोटाळ्यात मुख्याध्यापिकेला अटक

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ९**

शालार्थ घोटाळा प्रकरणात सायबर पोलिसांनी मेघा श्रीकृष्ण मते (५७) वृंदावन निवास, धनगरपुरा हिंगणा यांना अटक केली. मेघा मते या ग्रामोद्धार विद्या प्रसारक शिक्षण प्रसारक शिक्षण संस्था द्वारा संचालीत श्रीमती चिव्लेखादेवी भोसले उच्च प्राथमिक शाळा कान्होलीबारा येथे मुख्याध्यापक पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या शाळेत ५ शिक्षकांची बेकायदेशीर नियुक्ती असल्याचे व त्यांची शालार्थ आयडी बनावट असल्याचे माहित होते. तरीही मते यांनी त्या शिक्षकांच्या वतेन संबंधाने शाळेकडून आलेल्या प्रस्तावाची कुठलीही शहानिशा न करता त्यांचे नियमित वेतन संबंधात प्रस्ताव आपल्या स्वाक्षरीने दर महिन्याला वेतन अीक्षक कार्यालयात पाठवून त्यांचे पगार काढण्यात आले. त्यात मते यांनी शासनाची २८ लाखांनी आर्थिक फसवणूक केली. त्यांची ५ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी घेण्यात आली. आतापर्यंत या प्रकरणात एकूण २८ आरोपींना अटक करण्यात आली हे विशेष.

# दुचाकीच्या धडकेने वृद्धाचा अंत

**नागपूर, दि. ४ :** सकाळच्या वेळी फिरायला निघालेल्या वृद्धाला दुचाकीस्वाराने धडक देऊन ठार केल्याची घटना जयताळा मार्गावर घडली.

विठ्ठलराव नारायण पाटील (८०) अमर आशा ले आऊट, इंद्रप्रस्थनगर असे मृतकाचे नाव आहे. काल शनिवारी सायंकाळी ५.३० च्या सुमारास विठ्ठलराव हे सायंकाळच्या वेळी फिरायला गेले होते. जयताळा मार्गावरील भेले कबाडी या दुकानाजवळून जात असताना एमएच २८/८०२३ क्रमांकाच्या दुचाकीस्वाराने त्यांना धडक दिली. गंभीर अवस्थेत त्यांना मेडिकलमध्ये नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. धडक दिल्यानंतर दुचाकीस्वार दुचाकीसह पळून गेला.

# सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल रुग्णांच्या जीवनात सकारात्मक बदल

**नागपूर, दि. ४ जानेवारी :** कर्करोग हा आजच्या काळातील एक गंभीर आणि आव्हानात्मक आजार आहे. वैद्यकीय प्रगतीमुळे उपचार पद्धती प्रभावी झाल्या असल्या, तरी कर्करोगाशी संबंधित सामाजिक दृष्टीकोन अजूनही अनेक गैरसमज, भीती आणि पूर्वग्रहांनी ग्रासलेला दिसून येतो. कर्करोग हा केवळ शारीरिक आजार नसून तो रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबाच्या मानसिक, सामाजिक व भावनिक आयुष्यावर खोल परिणाम करणारा अनुभव असतो.

कर्करोग रुग्णांसोबत काम करताना असे वारंवार जाणवते की अनेक रुग्णांना समाजाकडून, नातेवाईकांकडून, शेजाऱ्यांकडून तसेच कधी कधी स्वतःच्या कुटुंबीयांकडूनही भेदभाव आणि दूर ठेवण्याचा अनुभव येतो. काही लोकांमध्ये अजूनही असा गैरसमज आहे की कर्करोग हा संसर्गजन्य आजार आहे, किंवा कर्करोग झालेल्या व्यक्तीशी संपर्क ठेवल्यास काही धोका होऊ शकतो. या चुकीच्या समजुतींमुळे रुग्ण सामाजिकदृष्ट्या एकाकी पडतात. कर्करोगामुळे शरीरातील बदल, केस गळणे, वजन कमी होणे, थकवा, उपचारांचे दुष्परिणाम यामुळे रुग्णांचा आत्मसन्मान आणि शरीरप्रतिमेवर (लेवू ळारसश) मोठा परिणाम होतो. यासोबतच समाजाकडून मिळणारी उपेक्षा, दुर्लक्ष किंवा टाळाटाळ ही मानसिक वेदना अधिक तीव्र करते. अनेक रुग्ण सांगतात की आजाराच्या काळात सर्वात जास्त गरज असते ती भावनिक आधाराची -कुणीतरी आपल्याशी बोलावे, ऐकून घ्यावे, आपलेपणाने विचारपूस करावी. एका समूह सत्रादरम्यान एका रुग्णाने अनुभव सांगितला की आजारपणात त्यांनी नातेवाईकांना फोन केला, पण अनेक वेळा फोन उचलला गेला नाही. काहींना वाटते की रुग्ण फोन करतो म्हणजे आर्थिक मदत मागणार असावा. प्रत्यक्षात मात्र अनेक वेळा रुग्ण फक्त मन मोकळे करण्यासाठी, थोडेसे धीर देणारे शब्द ऐकण्यासाठी संपर्क साधत असतात. अशा वेळी मिळणारे दुर्लक्ष त्यांना अधिक एकाकी आणि मानसिकदृष्ट्या खचलेले बनवते. कर्करोगाशी लढताना औषधोपचार जितके महत्त्वाचे आहेत, तितकेच महत्त्व मानसिक आरोग्य, सामाजिक आधार आणि स्वीकार यांना आहे. संशोधनातूनही स्पष्ट होते की ज्या रुग्णांना कुटुंब, मित्र आणि समाजाचा भावनिक पाठिंबा मिळतो, त्यांची उपचारांप्रती सकारात्मकता वाढते, ताण-तणावकमी होतो आणि जीवनमान सुधारते. म्हणूनच समाज म्हणून आपली जबाबदारी आहे की आपण कर्करोगाकडे भीतीने किंवा गैरसमजांनी न पाहता संवेदनशीलतेने आणि माणुसकीने पाहिले पाहिजे. कर्करोग रुग्णांना समाजातून वेगळे न करता त्यांचा समावेश करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांना संवाद, सन्मान आणि आधार देणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. कलंक आणि भेदभाव दूर करण्यासाठी जनजागृती, खुले संवाद, मानसिक आरोग्याविषयी शिक्षण आणि अनुभवकथन यांची गरज आहे. कर्करोग हा कोणाच्याही आयुष्यात येऊ शकणारा आजार आहे; तो कोणाचाही दोष नाही. रुग्णाला केवळ उपचारांची नाही, तर समजून घेणाऱ्या समाजाचीही तितकीच गरज असते.

## आध्यात्म आणि विज्ञान' या विषयावर धर्मभास्कर सद्गुरुदास महाराजांचे व्याख्यान

### सी. पी. ॲण्ड बेरार शिक्षण संस्थेच्या वतीने 'रौप्य महोत्सवी' व्याख्यानमालेचे आयोजन



**नागपूर, ४ जानेवारी :** सी. पी. ॲण्ड बेरार शिक्षण संस्थेच्या वतीने कै. ग. स. उपाख्य अण्णासाहेब गोखले, कै. मा. ना. उपाख्य बापूसाहेब कागभट आणि स्व. ॲड. शंकरराव उपाख्य बाबासाहेब पाध्ये स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. या व्याख्यानमालेचे यंदा 'रौप्य महोत्सवी' व्याख्यान असून परमपूजनीय धर्मभास्कर सद्गुरूदास महाराज हे 'आध्यात्म आणि विज्ञान' या विषयावर व्याख्यान पुष्प गुंफणार आहेत. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. अशोकराव बनसोड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. हा कार्यक्रम शनिवार दि. १० जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता स्व. ॲड. शंकरराव (बाबासाहेब) पाध्ये स्मृती सभागृह, सी. पी. ॲण्ड बेरार महाविद्यालय, तुळशीबाग, महाल नागपूर येथे आयोजिण्यात आला आहे. सी. पी.ॲड बेरार शिक्षण संस्था, नागपूरचे सेक्रेटरी विजयराव कागभट आणि सी. पी. ॲड बेरार महाविद्यालय, नागपूर चे प्राचार्य डॉ. अजय कुळकर्णी यांनी या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## वाडी येथे सावित्रीबाई यांना अभिवादन



**वाडी, दि. ४ :** वाडी नगर परिषद कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त मिठाईचे वितरण करण्यात आले. वाडी नगर परिषदचे नवनिर्वाचित अध्यक्ष नरेश चरडे यांनी दिप प्रज्वलन करून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी कर निरीक्षक संदीप तरडे,लेखा विभागाचे दर्शन बिराजदार, बांधकाम अभियंता सिद्धार्थ शार्दूल,आवास ,जेष्ठलिपीक योगेश जहागीरदार ,आवास योजना विभाग प्रमुख मयूर झाडे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण करून अभिवादन केले.कार्यक्रमाचे संचालन योगेश जहागीरदार यांनी केले.कार्यक्रमात भारत ढोके,मनोहर वानखडे,स्वच्छता निरीक्षक धनंजय गोतमारे,स्वच्छता ब्रॅण्ड एम्बेसिडर नरेशकुमार चव्हाण,अशोक जाधव,अग्निशमन दलाचे शंकर पंचबुद्धे,इंद्रजीत इरपाती,आदेश मरसकोल्हे,तुषार पातुरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

## साई इंटरनॅशनल स्कूलमध्ये पोलीस स्थापना दिन साजरा

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**रामटेक , दि. ४ :**




महाराष्ट्र सरकारने २ जानेवारी हा महाराष्ट्र पोलिसांचा स्थापना दिन म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे. सर्व युनिट कमांडर्सनी हा दिवस साजरा करण्यात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. स्वयंसेवकांना उत्साहाने आणि आवडीने समाजाची सेवा करण्यास प्रेरित करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. नागरिकांनी कायद्यांचे पालन करावे आणि इतरांना इजा पोहोचवू नये याची खात्री करणे आहे. यावेळी पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेंद्र तिवारी यांनी त्यांच्या पथकासह, हवालदार उमेश पाल, अशोक केंद्रे आणि वृषभ उईके यांनी रामटेक येथील साई इंटरनॅशनल स्कूलला भेट दिली आणि सभेला संबोधित केले. त्यांनी रस्ता सुरक्षेशी संबंधित सर्व नियम आणि कायदे समजावून सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांना दुचाकी चालवताना हेल्मेट घालण्यास, चारचाकी गाडी चालवताना सीट बेल्ट वापरण्यास सांगावे असा सल्लाही दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन विमा आणि पीयूसी बद्दल मार्गदर्शन केले. प्राचार्य राजेंद्र मिश्रा यांनी महाराष्ट्र पोलिस स्थापना दिन सोहळ्याचे महत्त्व अधोरेखित केले. शाळेचे संचालक डॉ.विठ्ठलराव नागपूरे यांनी शाळेच्या या कार्याचे कौतुक केले.

# उभ्या ट्रकवर दुचाकी आदळली

## चालक मृत, दोन गंभीर जखमी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**कुही, दि. ४**

भरधाव वेगाने निष्काळजीपणे दुचाकी चालकाने वाहन चालवत रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला जोरदार धडक दिली. त्यात दुचाकी चालक जागेवरच मृत झाला व सोबतचे दोन दुचाकी स्वार गंभीर जखमी झाले.

सदर घटना ही आज दि. ३ (शनी) ला दुपारी एक वाजताचे दरम्यान घडली. सदर घटनेत मोटर सायकल दुचाकी क्र. एम एच ४० सी एफ ७१९० क्रमांकाची दुचाकी असून चालक विकी प्रभाकर लाखे वय २४ वर्ष रा. जवळी, तह. भिवापूर हा जागीच मृत्यू पावला. चालक व त्याचे दोन मित्र जामसावळीवरून दर्शन करून गावला परत येत असताना चांपा बस स्टॉप जवळ सदर घटना घडली. रस्त्याच्या कडेला उभा असलेला ट्रक क्र. एम एच ४० सी एच ०९३७ यावर भरधाव वेगात आदळली. धडक इतकी जोरदार होती की, त्यात चालक जागेवरच मृत झाला. तर सोबत असलेले मोटार सायकल स्वार देवल दशरथ सिरसागर वय-२२ वर्ष रा- सालईभट्टी तह- उमरेड, कुणाल वसंतराव वाढई वय- २३ वर्ष रा- नांद, तह. भिवापुर यांना गंभीर मार लागला असुन दोन्ही जखमी यांचा उपचार हा ट्रामा सेन्टर मेडीकल कॉलेज नागपुर येथे सुरु आहे. पोलिसांनी बयान घेण्याचा प्रयत्न केला असता दोनही दुचाकी स्वार गंभीरित्या जखमी असल्याने ते बयान देण्याच्या स्थितीत नव्हते. सदर घटनेत मोटार सायकल चालक विकी लाखे याने निष्काळजीपणे भरधाव वेगाने मोटार सायकल चालवत उभे असलेल्या ट्रकला धडक दिली. मोटार सायकल चालक यावर गुन्हा दाखल करत सादर घटनेचा अधिक तपास कुही पोलीस करीत आहेत.



चांपा बस स्थानका जवळ अपघात

# घरफोडी करणाऱ्या दुचाकीचोरास अटक

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ४**

गुन्हे शाखेच्या युनिट ६ च्या पथकाने घरफोडी करणाऱ्या एका दुचाकीचोराला अटक करून त्याच्याकडून घरफोडीचे ५ गुन्हे उघडकीस आणले. २३ डिसेंबर रोजी सकाळी ९ च्या सुमारास डायमंड सोसायटी, मानेवाडा येथे राहणाऱ्या किसन घुसाजी कापगते (७१) यांनी त्यांची टीवहीएस ज्युपीटर दुचाकी घरासमोर कुलूपबंद करून ठेवली होती. २३ ते २७ डिसेंबरदरम्यान अज्ञात चोरांनी त्यांची दुचाकी चोरून नेली. याप्रकरणी अजनी पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला होता. युनिट ६ च्या पथकाने तांत्रिक तपास करून संघर्ष कैलास बागडे (१९) खापरखेडा यास पकडले. त्याच्याजवळ चोरीची दुचाकी मिळून आली.

त्याची सखोल विचारपूस केली असता त्याने मौदा, गिट्टीखदान येथे प्रत्येकी १ आणि सौंसर (म. प्र.) येथे ३ घरफोडी केल्याची कबुली दिली. पुढील कारवाईसाठी त्याला गिट्टीखदान पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# अंध मुलीवर अत्याचार करणाऱ्यास २० वर्षाची शिक्षा

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ४:** एका १५ वर्षीय अंध मुलीवर अत्याचार केल्याचा गुन्हा सिद्ध झाल्याने अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश जे. ए. शेख यांनी इंदोरा येथील विनोद नारायण नारडेवार (५५) यास २० वर्षांचा कारावास सुनावला.पीडित मुलगी ही दोन्ही डोळ्यांनी आंधळी आहे. वरोरा येथील अंध विद्यालयात ती शिकायला होती. उन्हाळ्यात शाळेला सुट्या लागल्याने ती नागपूरला आली होती. तिच्या घराचे बांधकाम सुरू असल्याने तिच्या आईने आरोपी विनोदच्या घराजवळच खोली घेतली होती. १८ जून २०२२ रोजी सकाळच्या वेळी मुलीची आई आपल्या कामावर गेली होती. त्याचप्रमाणे तिचा भाऊ देखील बाहेर गेला होता. मुलगी घरीच एकटी होती. ही संधी साधून आरोपी विनोदने तिच्या घरात प्रवेश केला आणि तिच्यावर अत्याचार केला. या घटनेनंतर मुलगी दारात बसून रडत होती. हा प्रकार शेजारच्या लोकांच्या लक्षात आला. शेजाऱ्यांनी तिला घरात नेऊन विचारणा केली असता तिने घडलेला प्रकार सांगितला. सायंकाळी मुलीची आई कामावरून घरी आली असता तिलाही हा प्रकार समजला. याप्रकरणी मुलीच्या तक्रारीवरून जरीपटका पोलिसांनी गुन्हा नोंदवून २० जूनला पोलिसांनी त्याला अटक केली. तत्कालीन सहायक पोलिस आयुक्त संतोष खांडेकर यांनी याप्रकरणाचातपास करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. न्यायालयात दोघांना हजर केले. त्यात एक आरोपी विनोद आणि दुसरा पोलिस होता. दोघांनाही न्यायाधिशांनी एक पुस्तक वाचायला सांगितले. त्यात पीडित मुलीने आरोपी विनोदचा आवाज बरोबर ऐकला आणि तसे न्यायालयाला सांगितले. त्यावरून न्यायालयाने विनोद यास दोषी ठरवून त्याला २० वर्षांची शिक्षा आणि १० हजाराचा दंड सुनावला. आरोपीतर्फे ॲड. मदन पुराणिक यांनी, तर सरकारतर्फे सहायक सरकारी वकील प्रशांत साखरे यांनी बाजू मांडली.

## गणेश टेकडी मंदिरात ६ ला तिळी चतुर्थी

**नागपूर, दि. ४ :** गणेश मंदिर टेकडी येथे ६ जानेवारीला तिळी चतुर्थीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्रीराम कुळकर्णी यांनी पत्रपरिषदेत दिली.यानिमित्त मंदिर परिसरात आकर्षक रोषणाई करण्यात आली असून पंकज अग्रवाल यांच्यावतीने सजावट करण्यात आली आहे. संस्थेच्या वतीने साडेसात किलो वजनाचे गर्भगृह तयार करण्यात आले आहे हे विशेष. याप्रसंगी भक्तांना ९०० किलो गुळाच्या रेवडीचे प्रसाद वाटप करण्यात येईल. कुठलीही दुर्घटना घडू नये आणि भाविकांना सहजपणे श्रीचे दर्शन घेता यावे यासाठी वाहतूक पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे ५०० स्वयंसेवकांची मदत घेण्यात येत आहे. ६ तारखेला सकाळी ४ वाजता अजय संचेती यांच्या हस्ते महापूजा आरती करण्यात येईल. यासाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्याचे कुळकर्णी यांनी पत्रकारांना सांगितले.

## तक्रार निवारण दिनी १३७ तक्रारी निकाली

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ४ :** पोलिस स्थापना दिनाचे औचित्य साधून परिमंडळ ४ येथे तक्रार निवारण दिनाचा कार्यक्रम घेऊन १३७ तक्रारी निकाली काढण्यात आल्या. परिमंडळ ४ अंतर्गत नंदनवन, सक्करदरा, इमामवाडा, अजनी, बेलतरोडी आणि हुडकेश्वर येथे तक्रार दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

यासाठी १३७ तक्रारदार हे तक्रार असलेल्या पोलिस ठाण्यात हजर होते. प्रत्येक पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी तक्रारदाराचे म्हणणे ऐकून सक्करदरा, बेलतरोडी येथे प्रत्येकी १, अजनी २ अशा ४ तक्रारींवर गुन्हे दाखल करण्यात आले.

# खुनातील ९ आरोपींवर मोक्काची कारवाई

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ४:** पैशाच्या वादातून एका इसमाचा खून केल्याप्रकरणी शहर पोलिसांनी या खुनातील ९ आरोपींवर मोक्काची कारवाई केली आहे. परमितसिंग गौर उर्फ बाबू गुरूबच्चनसिंग गौर (२७) कोलबा स्वामीनगर, सोनू इंदल कोडापे (३५), अमित नारायण निळारे (३५), संकेत पुरुषोत्तम बोरीकर (३२), विपीन निळकंठ मेश्राम (३९) सर्व रा. कुंदनलाल गुप्तानगर, तरवेंदरसिंग उर्फ सोनूसिंग गुरूबच्चनसिंग गौर (३९) नासुप्र मैदानाजवळ शाहू मोहल्ला, जितेंनुरसिंग उर्फ बंटीसिंग संसारसिंग राठोड (४८) शिख छावणी, सायराबाद, जि. गंगारेड्डी (तेलंगाना) आणि जोगीन्दरसिंग उर्फ रोहीत श्रवणसिंग भाटीया (३३) सायराबाद (तेलंगाना) अशी या आरोपींची आहेत. मुख्य आरोपी हरजीतसिंग उर्फ सिटूसिंग गुरूबच्चनसिंग गौर (३६) शाहू मोहल्ला हा अजूनपर्यंत पोलिसांच्या हाती सापडला नाही.

मृतक सचिन उर्फ सोनू ओमप्रकाश शाहू (४०) यशोधरानगर यांनी आरोपी सोनूसिंग गौर याच्याकडून ७० हजार रुपये व्याजाने घेतले होते. सचिनने संपूर्ण पैसे व्याजासह आरोपीस परत केले होते. फक्त २५ हजार रुपये द्यायचे बाकी होते. त्यासाठी आरोपी सोनूसिंग व त्याचे साथीदार बाबू गौर, शितू हे सचिनला तीन लाख रुपये मागत होते. त्यावरून मागील काही दिवसांपासून त्यांच्यात वाद सुरू होता. याच कारणावरून १५ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १.४५ च्या सुमारास आरोपी परमितसिंग गौर, संकेत बोरीकर व इतरांनी कांजी हाऊस चौक ते विटा भट्टी चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील गुरूकुल एज्युकेशन अकादमीसमोर सचिनला अडविले. तीक्ष्ण शस्त्राने त्याच्या गळ्यावर, छातीवर व पोटावर मारून त्याला जिवानिशी ठार केले. याप्रकरणी यशोधरानगर पोलिसांनी खुनाचा नोंदवून आठ आरोपींना अटक केली. तपासात आरोपींनी आपली दहशत पसरविण्याच्या उद्देशाने सचिनचा खून केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्या मोक्का अन्वये कारवाई करण्यात आली.

## निधन वार्ता

### प्रभाकर पारधी



**नागपूर, दि. ४** सिल्ली (भंडारा) निवासी प्रभाकर बाबुराव पारधी यांचे दीर्घ आजाराने शनिवारी निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ६४ वर्षे होते. त्यांच्या पश्चात मुलगा, २ मुली, नातवंडे व मोठा आप्तपरिवार आहे. अंत्यसंस्कार पार पडला.

### मदन मुजुमदार



**नागपूर, दि. ४ :** खापरी येथील निवासी मदन पद्माकर मुजुमदार यांचे निधन -वय ६१ वर्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक मदन पद्माकर मुजूमदार यांचे निधन अंतिम संस्कार सहकारनगर घाटावर करण्यात आले.

# खेडी (गो.गो.) येथे भीमा कोरेगाव विजयी शौर्य दिन उत्साहात साजरा

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**सावरगांव, दि. ४**

भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक विजयाला उजाळा देत खेडी (गो.गो.), ता. नरखेड, जि. नागपूर येथे भीमा कोरेगाव विजयी शौर्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. १ जानेवारी १८१८ रोजी झालेल्या भीमा कोरेगावच्या युद्धात अवघ्या ५०० महार सैनिकांनी पेशव्यांच्या सुमारे २५ ते २८ हजार सैन्याचा पराभव करून इतिहास घडविला. या युद्धातील शहीद महार सैनिकांच्या स्मृतीप्रित्यर्थ इंग्रजांनी भीमा कोरेगाव येथे विजयस्तंभ उभारला आहे. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ वैशाली बुद्ध विहार समाजसेवा समिती व गावातील श्रद्धावान बौद्ध उपासक-उपासिका यांच्या संयुक्त विद्यमाने मु. खेडी (गो.गो.) येथील वैशाली बुद्ध विहार येथे गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात विश्वरत्न बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास गट ग्रामपंचायत खेडी (गो.गो.)च्या मन्नाथ सरपंच सौ. नंदाताई अनिल बांदरे व उपसरपंच साहिल ढोके यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन व माल्यार्पण करून करण्यात आली. त्यानंतर महाकारुणिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस ज्येष्ठ समाजसेवक अरुण राऊत यांच्या हस्ते, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस श्रद्धावान उपासक बाळकृष्ण सोमकुवर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर माजी सरपंच अनिल बांदरे यांच्या हस्ते भीमा कोरेगाव शौर्य दिन विजयस्तंभाच्या प्रतिकृतीस विधिवत दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले.उपस्थित समता सैनिक दल खेडी (गो.गो.)चे सर्व कार्यकर्ते तसेच गावातील श्रद्धावान बौद्ध उपासक-उपासिकांनी विजयस्तंभाच्या प्रतिकृतीस सलामी देत मानवंदना अर्पण केली.

यावेळी समता सैनिक दलाचे कार्यकर्ते पांढऱ्या शुभ्र वेशात व निळ्या टोपीसह ड्रेस कोडमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वैशाली बुद्ध विहार समाजसेवा समितीचे पदाधिकारी तसेच गावातील श्रद्धावान बौद्ध उपासक-उपासिकांनी विशेष परिश्रम घेतले.


## लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नागपूर

**ई – निविदा सुचना क्र ०५/२०२५-२६**

लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद, नागपूर यांचे मार्फत सन २०२५-२६ मध्ये विवीध योजनाअंर्तगत मंजूर कामाची ई निविदा सुचना क्र ०५/२०२५-२६ मध्ये प्रथम वेळ खुला प्रवर्ग कंत्राटदार यांचे करीता ५०.०० लक्ष वरील मर्यादेतील कामे शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेंतस्थळावर प्रसिध्द करण्यांत योनार आहे. सदर निविदेत अ.क्र. १ ते ४ कामांचा समावेश आहे.

| अ.क्र. | तपशिल | निविदा विक्रिचा दिनांक | निविदा स्विकृती दिनांक |
|---|---|---|---|
| अ) | कामांची संख्या १ ते ४ | दि. ०५/०१/२०२६ ते दि.१३/०१/२०२६ पर्यंत | दि. १३/०१/२०२६ ला दुपारी ३ वाजेपर्यंत राहील |

ब) कामाची अंदाजीत एकुण किंमत रु. ३०६.९९ लक्ष ऐवढी आहे.

निविदे संबधीत समाविष्ट अटी व शर्ती तसेच कामाचे शेड्रूल बी व निविदेत प्रस्तावित कामाची यादी व निविदेशी संबधीत ईतर अनुषांगीक माहीती शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदाधारकां करीता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदेत समाविष्ट अ.क्रं. १ ते ४ या कामाकरीता भरना करावी लागनारी को-या निविदा संचाची किंमत व कामाच्या किंमतीच्या १ टक्के प्रमाणे अनामत रक्कम Net banking च्या स्वरुपात CA & FO Z.P. Nagpur यांचे खाती अदा करुन सदर रक्कम भरनाकेल्याची पावती ऑनलाईन संकेतस्थळावर अपलोड करावी. प्रकाषित करण्यात येत असलेल्या निविदा अंतीम दिनांकाच्या ४८ तासाचे आत किंवा निविदा समितीने सुचविलेल्या दिनांकास उघडण्यात येईल. याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा.)
जिल्हा परिषद, नागपूर

अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर


RNI NO. MAHMAR/ 2008/26657

This daily has been printed by Sagar Harishprasad Kothari, printer and publisher on behalf of Shri Sai Prakashan, Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and has been published at Yuvarashtra Darshan office, Opposite Old Navbharat, Cotton Market, Nagpur 440018. **Editor:** Sagar Harishprasad Kothari (responsible for editorial as per PRB act). The editor might not necessarily agree with the content published in the newspaper. Disputes if arising, shall be settled under the jurisdiction of Nagpur based courts. Group Editor : Sandeep Ramrao Kale Office Phone No: 7447735851

RNI NO. MAHMAR/ 2008/26657

हे पत्र मालक श्री. साई प्रकाशनकरिता मुद्रक, प्रकाशक - सागर हरिषप्रसाद कोठारी यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून युवाराष्ट्र दर्शन कार्यालय, जुना नवभारत समोर, कॉटन मार्केट, नागपूर ४४००१८ येथे प्रसिद्ध केले. संपादक : सागर हरिषप्रसाद कोठारी (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर) वृत्तपत्रातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कुठलाही वाद नागपूर न्यायालयांतर्गत. समूह संपादक : संदीप रामराव काळे. कार्यालय फोन : ७४४७७३५८५१